



त्रैमासिक

# वनसखा


वनवासी विकास प्रकल्प, तलासरी


## वार्षिक अहवाल २०१४-१५


# विश्व हिन्दू परिषदेची सुवर्ण महोत्सवी वाटचाल

## १९६४-२०१४

## संस्थापक सदस्य



प.पू.श्री. गोळवलकर गुरुजी



पू.स्वामी चिन्मयानंदजी



श्री. हनुमानप्रसाद पोद्दार

विश्व हिन्दू परिषद

धर्मो रक्षति रक्षितः


श्री. कन्हैय्यालाल मुन्शी


मास्टर तारासिंग


राष्ट्रसंत पूजनीय तुकडोजी महाराज




दिनांक १४ ऑगस्ट २०१५ रोजी अखंड भारत संकल्प दिनानिमित्त काढण्यात आलेल्या मशाल मिरवणूकीचे दृष्य



दिनांक १४ फेब्रुवारी २०१५ रोजी मा.ना. श्री. विष्णुजी सवरा यांच्या हस्ते कै. अंधेरगुरुजी यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण करण्यात आले.





विश्व हिन्दू परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त तलासरी प्रकल्पामध्ये विद्यार्थी आणि विद्यार्थीनींनी वृक्षारोपण केले



वसतीगृहातील विद्यार्थी भाताचे रोप खणताना दिसत आहेत.



वसतीगृहातील विद्यार्थीनी रोपणी करताना दिसत आहेत.

**वनसखा**

दैन्य विघटना दिसे सभोवती
मनात सलते हे शल्य।
ते काढाया यत्न करावे
यातच जीवनसाफल्य।।

***विश्व हिंदू परिषदेच्या वनवासी विकास प्रकल्प तळासरीचे, त्रैमासिक***

**प्रारंभ :** ऑक्टोबर १९९६

वर्ष १९ वे, अंक ४था

**वृत्तसंकलन :** मार्च ते मे १५ तसेच जून १४ ते मे १५ या वर्षातील विशेष वृत्त

**✦ संपादक ✦**
श्री. नारायण ठाकरे

**✦ सहसंपादक ✦**
श्री. प्रसाद थापड

**✦ जाहिरात विभाग ✦**
श्री. नाना फिरके, श्री. सखाराम गावित, श्री. धनजी धोडी

**व्यवस्थापक :** श्री. विलास मेढा

**✦ प्रकाशक ✦**
श्री. किशोर वझे
कार्यवाह, वनवासी विकास प्रकल्प
तळासरी ४०१६०६, जि. पालघर.
दूर.: ९८३३६६११०९
०२५२१-२२००१९ कार्यालय
(कृपया वरील पत्यावर पत्रव्यवहार करावा)

**वार्षिक वर्गणी :** १०० रुपये (देणगी मूल्य)

पुढील अंक : १ ऑक्टोबर २०१५

**✦ वितरण सहाय्य ✦**
वनवासी विद्यार्थी-विद्यार्थिनी वसतिगृह तळासरी

**✦ अक्षर जुळणी व मुद्रक ✦**
आर्टेज इंडीया
१२, जनार्दन आर्केड, डहाणू रोड (प.)

केवळ खाजगी वितरणा साठी



**राष्ट्रिय सौर दिनांक :**
**१० आषाढ**
**युगाब्द ५११७,**
**शके १९३७,**

***त्रैमासिक***
# वनसखा

**१ जुलै २०१५, बुधवार**


## ✦ हितगूज ✦

सन २०१४-१५ चा वनवासी विकास प्रकल्पाचा हा वार्षिक अहवाल आपल्यासमोर सादर करताना आनंद होत आहे. विश्व हिन्दू परिषदेच्या माध्यमातून तळासरी प्रकल्पाची स्थापना झाली. विश्व हिन्दू परिषदेचे हे सूवर्णमहोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्ताने प्रकल्पामधेही काही कार्यक्रम झाले. आता कार्यकर्त्यांना वेध लागले आहेत तळासरी प्रकल्पाच्या सूवर्ण महोत्सवी वर्षाचे! विश्व हिन्दू परिषदेचे संयुक्त महामंत्री मा.श्री. विनायकराव देशपांडे यांच्या प्रमूख उपस्थितीत कल्याण येथे दिनांक २० जून १५ रोजी सुवर्णमहोत्सवी वर्षाचा (२०१७-१८) विचार करण्यासाठी पहिली बैठक संपन्न झाली. या अंकापासून त्याविषयी माहिती देण्यात येईल.

## ✦ आगामी अंकात ✦

दिनांक १ ऑक्टोबर २०१५ : कै. माधवराव काणे स्मृति विशेषांक

- → **'कथा प्रकाशकिरणांची':** धडपडणाऱ्या, चाकोरी बाहेरची वाट पकडून मार्गक्रमण करणाऱ्या कार्यकर्त्यांचा परिचय करुन देणारे सदर
- → **बाहेरचे दिवे :** तळासरी प्रकल्पासाठी वर्षानुवर्ष विविध प्रकारे मदत करणाऱ्या कार्यकर्त्यांचा परिचय करुन देणारे सदर.
- → **दिनदर्शिका :** ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर २०१५
- → **आमचे दादा अर्थात दानदाते**
- → **ओळख वनवासी जीवनाची**
- → **संस्था परिचय :** कालगतीच्या चक्रावरती पर्व नवे ते कोरुया
- → **हे पान मुला मुलींचे**
- → **उपेक्षित वैदूभगत :**
- → याशिवाय जून ते ऑगस्ट १५ चे विशेष वृत्त, चिंतन, पत्रवन, देणगीदार सूची


**✦ कार्यालय ✦**
३६ पिरोजा मेन्शन, ग्रँटरोड रेल्वेस्थानकासमोर,
ग्रँटरोड (पूर्व), मुंबई ४००००७. दूरध्वनी ०२२-२३०५०३९३

**वनवासी कल्याण केंद्र :** ९/१०, वसुंधरा अपार्टमेंट
इराणी रोड, डहाणू रोड-४०१६०२, जि. ठाणे.
दुरध्वनी : ०२५२८-२२०७६४


**मनोरथांना अप्राप्य काहीच नाही.**

## या अंकात


✦ शुभसंदेश ........................................ ३
✦ विशेष उपक्रम दिनदर्शिका ............................ ५
✦ ज्योतिपुंज बाळासाहेब केशव देशपांडे व्यक्ती आणि कार्य (क्रमशः) ................................ ६
✦ वनवासी विकास प्रकल्प कार्यकर्ता वृंद ............... ७
✦ पत्रवन.......................................... ८-९
✦ शालांत परीक्षा मार्च २०१५ निकाल! ............ १०
✦ आमच्या योजना ..................................... १०
✦ कै. महादेव सावजी अंधेर, सुत्रकार .............. ११
✦ तळासरी : सेवा पर्यटन ......................... १२
✦ आवाहन ............................................. १२
✦ नोंद................................................ १४
✦ अभिनंदन .......................................... १४
✦ वाचावे असे काही ................................ १४
✦ निधी संकलक ..................................... १५
✦ बाहेरचे दिवे, श्री. वसंत गणेश रानडे ............ १६
✦ श्री. महादेव जयराम तथा आप्पा जोशी ........... १७
✦ विशेष उल्लेखनीय घटना.......................... १९
✦ दुर्गम भागाचा विकास हे धर्मादादा यांचे ध्येय..... २०
✦ अभिप्राय .......................................... २१
✦ चिंतन............................................... २१
✦ ओळख वनवासी जीवनाची ........................ २२
✦ तळासरी प्रकल्प सूवर्ण महोत्सवी वर्ष............. २३
✦ कथा प्रकाशकिरणांची, कमलाकर उराडे ............ २४
✦ मनोगत ............................................ २६
✦ हेपान मुला मुलींचे................................ २७
✦ प्रेरणा गीत, बोधकथा ............................ २७
✦ देणगीदार यादी................................२८, २९
✦ स्थानिक देणगी.................................... ३०
✦ धान्यरुपाने देणगी ................................ ३०
✦ श्रमसेवेचा यज्ञ सेवायोगी गाडगेबाबा.............. ३२


### विश्व हिन्दू परिषद संचलीत
## वनवासी विद्यार्थी वसतिगृह
### शैक्षणिक वर्ष २०१४-१५ वर्षातील इयत्तावार वार्षिक निकाल

| इयत्ता | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | एकूण | निकाल |
|---|---|---|---|---|
| १५ वी | ०१ | ०० | ०१ | १००% |
| १४ वी | ०१ | ०० | ०१ | १००% |
| १३ वी | ०१ | ०० | ०१ | १००% |
| १२ वी | ०३ | ०० | ०३ | १००% |
| ११ वी | ०६ | ०० | ०६ | १००% |
| १० वी | २३ | ०१ | २४ | ९५.८३% |
| ९ वी | ३३ | ०५ | ३८ | ८६.८४% |
| ८ वी | २६ | ०० | २६ | १००% |
| ७ वी | १४ | ०० | १४ | १००% |
| ६ वी | १७ | ०० | १७ | १००% |
| ५ वी | १६ | ०० | १६ | १००% |
| एकूण | १४१ | ०६ | १४७ | ९५.९१% |

### विश्व हिन्दू परिषद संचलीत
## वनवासी विद्यार्थिनी वसतिगृह
### शैक्षणिक वर्ष २०१४-१५ वर्षातील इयत्तावार वार्षिक निकाल

| इयत्ता | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | एकूण | निकाल |
|---|---|---|---|---|
| १४ वी | ०२ | ०० | ०२ | १००% |
| १२ वी | ०३ | ०० | ०३ | १००% |
| ११ वी | ०४ | ०० | ०४ | १००% |
| १० वी | ११ | ०१ | १२ | ९१.६६% |
| ९ वी | ०९ | ०० | १० | ९०% |
| ८ वी | १२ | ०० | १२ | १००% |
| ७ वी | ०५ | ०० | ०५ | १००% |
| ६ वी | ०४ | ०० | ०४ | १००% |
| ५ वी | ०३ | ०० | ०३ | १००% |
| एकूण | ५३ | ०२ | ५५ | ९६.३६% |

कावळा काळा आणि कोकिळही काळा मग या दोघात फरक कोणता ? वसंतऋतु आला म्हणजे मात्र कावळा तो कावळा आणि कोकिळ तो कोकिळ हे लक्षात येते. माणसं सगळी सारखी परंतु संधी मिळाली की कलावंताचे असामान्यत्व कळते

# ❧ शुभसंदेश ❧

**सुहास हिरेमठ**
"भारती भवन" न्यु कॉलोनी,
जयपुर, राजस्थान

दिनांक : ७ मे, २०१५

प्रिय विवेक यास,

प्रतिवर्षाप्रमाणे वनसखा चा वार्षिक अंक आपण प्रसिद्ध करीत आहात हे ऐकून अतिशय आनंद झाला.

गेल्या ४७ वर्षापासून तळासरी सारख्या मुंबई पासून जवळ असूनही प्रगती, विकासापासून दूर राहिलेल्या वनवासी क्षेत्रामध्ये हा आश्रम चालतोय. आतापर्यंत हजारो विद्यार्थी येथे राहून शिक्षण व संस्कार घेऊन आपल्या वैयक्तिक जीवनात स्थिरावले. त्यापैकी अनेक सामाजिक कार्यात योगदान देत आहेत.


कल्याणसारख्या शहरी जीवनातून आणि नगरपालिकेच्या सत्तेच्या राजकारणापासून पर्यायाने पद, पैसा, प्रसिद्धीपासून दूर राहून जे खरोखरच त्या सर्व विद्यार्थ्यांचे - माधवराव काणे यांचेपासून ते तुम्हा पर्यंत पालक बनले अशा अनेकांच्या परिश्रमातून उभ्या राहिलेल्या या कार्याचा परिचय या अंकामुळे अनेकांना होत असेल म्हणूनच या अंकाचे एक आगळे वेगळे महत्व आहे. हा अंक परिचितांबरोबरच या कार्यापासून शरीराने, मनाने आणि बुद्धीने दूर असणाऱ्यांपर्यंत पोचावा. त्यांना या कार्याचा परिचय व्हावा व आपल्यासारखे काही ना काही योगदान यामध्ये देवून समाजऋण फेडण्याची प्रेरणा जागृत व्हावी हीच अपेक्षा.

आपणा सर्वांना, सर्व विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना हार्दिक शुभेच्छा!

सर्वांचा मंगलकांक्षी
**सुहास हिरेमठ**
**अखिल भारतीय सेवा प्रमुख**
**रा. स्व. संघ**

घोड्याला बळी देत नाहीत, हत्तीलाही कोणी बळी देत नाहीत आणि वाघाला नाहीच नाही. बोकडाचा बळी द्यावा असे यज्ञशास्त्र सांगते. देवसुद्धा दुर्बलांनाच मारक आहे.

# अर्पण पत्रिका



## श्री. महादेव सावजी अंधेर (गुरुजी)

**जन्म : १४ फेब्रुवारी १९३९ मृत्यू - २ ऑगस्ट २०१४**

*केवळ शरीराने अपंग असलेले*

*श्री. महादेव सावजी अंधेर (गुरुजी)*

*रा. सुत्रकार, ता. तलासरी हे*

*मनाच्या जिद्दीवर शिकले, मोठे झाले*

*शाळा चालवू लागले. मुख्याध्यापक झाले*

*निवृत्तीनंतरही शिक्षण, धर्म, संस्कृती*

*यावर लेखन करीत राहिले.*

**हा वर्षिक अहवाल २०१४-१५ त्यांना अर्पण करीत आहोत**

# विश्व हिन्दू परिषद संचालीत वनवासी विकास प्रकल्प तलासरीचा विशेष उपक्रम दिनदर्शिका २०१५



कुमार महेश चिमण बुजड इ.११वी



कुमार विजय नथू मासमार-इ. ११वी



कुमारी ज्योती जाना दुमाडा इयत्ता १०वी

## जुलै २०१५

| रवि | सोम | मंग | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ | २ | ३ | ४ |
| ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | |

## ऑगस्ट २०१५

| रवि | सोम | मंग | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| ३० | ३१ | | | | | १ |
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ |

## सप्टेंबर २०१५

| रवि | सोम | मंग | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ |
| २७ | २८ | २९ | ३० | | | |

# आगामी कार्यक्रम आणि दिन विशेष

## जुलै २०१५

- दि. १ : वनसखा वर्षिक अहवाल (२०१४-१५) प्रकाशन
- दि. ४ : स्वामी विवेकानन्द पुण्यतिथी शाळेत कार्यक्रम
- दि. २५ : आषाढ शु. नवमी-कांदेनवमी
- दि. २७ : आषाढी एकादशी चातुर्मास प्रारंभ
- दि. ३१ : गुरुपौर्णिमा, व्यसपौर्णिमा
  शिक्षकांना वन्दन
  शाळेत कार्यक्रम
  रा.स्व.संघ आणि रा.से.समिती उत्सव
  शिक्षकांचे एकत्रीकरण

वसतिगृहाचा एकदिवसीय अभ्यासवर्ग

## ऑगस्ट २०१५

- दि. १: शाळेत लो. टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त वक्तृत्वस्पर्धा
- दि. १४ : निज आषाढ अमावास्या दीपपूजन
  अखंड भारत संकल्प दिन
- दि. १५ : स्वातंत्र्यदिन
- दि. १९ : नागपंचमी
- दि. २९ : रक्षाबंधन, श्रावणपौर्णिमा
- दि. ३० : श्रीगणेशोत्सव मंडळ बैठक

## सप्टेंबर २०१५

- दि. ५ : श्री कृष्ण जयंती
  विश्व हिन्दू परिषद वर्धापन दिन
- दि. ६ : गोपाळकाला
- दि. १६ : श्री गणेशमूर्ती वितरण
- दि. १७ : श्रीगणेशचतुर्थी
- दि. २७ : श्री अनंत चतुर्दशी

# ज्योतिपुंज बाळासाहेब केशव देशपांडे व्यक्ती आणि कार्य



भोपाळहून परततांना इटारसी स्टेशनवर त्यांची योगायोगाने श्री. गुरुजींशी भेट झाली. बाळासाहेबांचा उदास चेहरा बघून श्री गुरुजींनी ''काय बाळासाहेब, कसे चालले आहे?" अशी विचारणा केली. बाळासाहेबांनी सर्व वृत्तांत सांगितला. त्यावर श्री. गुरुजी सहज हसत हसत म्हणाले, "जे झाले ते योग्यच आहे. आपले काम समाज आधारीत असावे. सरकार आधारीत नाही." यातून आपल्या सगळ्यांसाठी मोलाचा संदेश मिळाला. जणू नियतीने कल्याण आश्रमाच्या भविष्यातील कार्य हितासाठी, एक संकेत दिला.

**श्रद्धाजागरण**

कल्याण आश्रमाची सुरुवातीची २५ वर्षे बाळासाहेबांसाठी अत्यंत महत्वपूर्ण होती. त्यांनी सुरुवातीपासूनच वनवासी बांधवाच्या जीवनात श्रद्धाभाव वृद्धिंगत व्हावा या दृष्टीने कल्याण आश्रमाच्या कार्यास प्राधान्य दिले. जनसामान्यांपर्यंत पोहचण्यासाठी हे एक प्रभावी माध्यम होतेच. तसेच त्यास मातीचा सुगंधही होता. या दृष्टिने कार्यकर्त्यांनी एक योजना आखली. विष्णू महायज्ञाचे आयोजन करण्यात आले. त्यांत धर्मसभा झाली. साधू संतांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला.

आपल्या छात्रावासातील मुलांमध्ये भक्तीभाव जागृत व्हावा, आपल्या महान राष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन व्हावे म्हणून सर्व बालकांना राजेसाहेबांच्या मदतीने १९५४ च्या प्रयाग येथील कुम्भ मेळ्यात नेण्यात आले. जशपूरचे राजे स्वतः आपल्या बसमधे बालकांना प्रयाग येथे घेऊन गेले. १९५९ मध्ये सहस्त्रचंडी यज्ञाचे आयोजन करण्यात आले. वाराणसीहून वेदशास्त्रसंपन्न विद्वानांना पाचारण करण्यात आले. १९६२ मध्ये कल्याण आश्रमांस १० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कार्ययुक्त क्षेत्रात धर्मजागरणाची योजना आखण्यात आली. अनेक संतांचे वनवासी क्षेत्रात येणे झाले. पूज्य श्री. स्वरुपानंदजी महाराज, श्री. प्रभूदत्त ब्रह्मचारी व श्री. राम भिक्षू महाराज इत्यादि अनेक संत येथे आले. सर्व वातावरण धर्ममय होऊन गेले. यात्रेच्या आयोजनामुळे जशपूर क्षेत्र एका संघटन सूत्रांत बांधले गेले. कल्याण आश्रमाच्या नवीन वास्तूचा उद्‌घाटन कार्यक्रम प.पू.श्री. गुरुजींच्या हस्ते झाला.

**कार्य विस्तार :**

श्री. गुरुजींच्या प्रेरणेने १९६५ मध्ये जशपूरला एक आयुर्वेदिक चिकित्सालय सुरु करण्यात आले. सन १९६७-६८ मध्ये मुंबईचे श्री. एकनाथ गोरे एक प्रस्ताव घेऊन बाळासाहेबांना भेटण्यास जशपूरला आले. कल्याण आश्रमासाठी विदेशातून अर्थसाहाय्य मिळवावे असा प्रयत्न करण्याचा त्यांचा प्रस्ताव होता. त्यांना वनवासी क्षेत्र व तेथील समस्या आणि तेथे सुरु असलेल्या कल्याण आश्रमाची माहिती देली गेली. श्री. गोरेंना चिकित्सा सेवा कार्यात विशेष रुची होती. त्यांनी लंडनला जाऊन तेथील आपल्या मित्रांशी विचारविनिमय करून कल्याण आश्रम ट्रस्ट, लंडनची स्थापना केली. वनवासी क्षेत्रासाठी लंडनहून दोन चिकित्सा वाहने पाठविण्यात आली. ही चिकित्सा वाहने जसजशी दुर्गम, दुर्लक्षित क्षेत्रांत सेवेसाठी जाऊ लागली तसा तसा संपूर्ण जशपूर आणि सरगुजा जिल्हा कल्याण आश्रमाशी जोडला गेला.

## सीमोल्लंघन

१९६८ मध्ये एक बैठक झाली. बैठकीचे मार्गदर्शन आदरणीय भाऊराव देवरस करीत होते. विषय होता- कार्यविस्तार. त्यावेळी देशाच्या झारखंड, नागालँड क्षेत्राला अलगाव आंदोलनापासून वाचविणे हा एक चिंतेचा विषय होता. कार्यकर्त्यांनी एक कार्ययोजना बनविली. आता कार्य जशपूरच्या बाहेर बिहारमधील गुमलापर्यंत तसेच ओरिसातील सुंदरगढपर्यंत वाढविण्याचे निश्चित झाले श्री. शिलेदार दाम्पत्याच्या प्रयत्नांतून लोहरदगा येथे १९७२ मध्ये एक दवाखाना व छात्रवास आणि बालिसंकरा येथे एक छात्रावास सुरु झाले होते. **(क्रमशः)**

ज्या तळ्यातले पाणी पिण्यासारखे नसते त्या तळ्यातच भरपूर पाणी असते. उदार नसलेल्या माणसाजवळच पुष्कळ संपत्ती साठलेली दिसते.

# ✻ वनवासी विकास प्रकल्प : कार्यकर्ता वृंद ✻

## ✻ संचालक मंडळ ✻

| अनु. | नाव | पद | दूरभाष क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री. रतन सिंघानिया | अध्यक्ष | ९८२०१५६४५७ |
| २. | श्री. चिंतामण वनगा | उपाध्यक्ष | ९२७१५०५२६० |
| ३. | श्री. किशोर वझे | कार्यवाह | ९२२३५५८८६३ |
| ४. | श्री. सखाराम गावित | सहकार्यवाह | ९२२६११८९५१ |
| ५. | श्री. रघुनाथ फाटक | सदस्य | ९८३३६६११०९ |
| ६. | श्री. माधव बर्वे | सदस्य | ९२२३३००३५० |
| ७. | श्री. रामचंद्र रामुका | सदस्य | ९३२२२२८५१३ |
| ८. | श्री. नथमल सिंघानिया | सदस्य | ९३२४५२००४० |
| ९. | श्री. रमेश मलावकर | सदस्य | ९२७००२४०६८ |

## ✻ तळासरी प्रकल्प संचालन समिती ✻

| अनु. | नाव | पद | दूरभाष क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री. लक्ष्मण खरपडे | अध्यक्ष | ९८२१२२६९४२ |
| २. | श्री. हरेश्वर वनगा | कार्याध्यक्ष | ९६३७७३३५२४ |
| ३. | श्री. मधू ठाकरे | कोषाध्यक्ष | ९८६०९९५९११ |
| ४. | श्रीम. रंजना डोंगरकर | उपाध्यक्षा | ९६२४२३२७४८ |
| ५. | श्री. भरत भूरे | सचिव | ९८९००६६८४५ |
| ६. | श्री. यशवंत चौधरी | सहसचिव | ९२७०८०९५४७ |
| ७. | श्री. राजेंद्र टोकरे | सदस्य | ८०८७१९५७७४ |
| ८. | श्री. नाना फिरके | सदस्य | ८००७८८१००९ |
| ९. | श्री. छगन वावरे | सदस्य | ९७६४९२८४६९ |

# ✻ वनवासी विद्यार्थी आणि विद्यार्थिनी वसतिगृह - तळासरी ✻

## ✻ वनवासी विद्यार्थी वसतीगृह ✻

| अनु. | नाव | पद | दूरभाष क्र. |
|---|---|---|---|
| १ | श्री. रघनाथ नारायण फाटक | संचालक | ९८३३६६११०९ |
| २ | श्री. विवेक श्रीकृष्ण वैद्य | व्यवस्थापक | ९२७२६०७८१८ |
| ३ | श्री. वसंत देवू भूसारा | सहव्यवस्थापक | ९६७३६६३८२७ |
| ४ | सौ. सुमन लखमा मलावकर | आचारी | - |
| ५ | सौ. सुमन विष्णू फरले | सहआचारी | - |
| ६ | श्री. विष्णु रुपजी फरले | चौकीदार | - |

## ✻ वनवासी विद्यार्थिनी वसतीगृह ✻

| अनु. | नाव | पद | दूरभाष क्र. |
|---|---|---|---|
| १ | सौ. सुधा रमेश मलावकर | व्यवस्थापिका | ९२७२०५०३८५ |
| २ | श्री. गोविंद अर्जून दुमाडा | आचारी | |
| ३ | श्री. लखमा शंकर मलावकर | चौकीदार | |

## ✻ गोशाळा कर्मचारी ✻

| अनु. | नाव | पद | दूरभाष क्र. |
|---|---|---|---|
| १ | श्री. विष्णू कोंढारी | प्रमुख | ९८६०२६३४८१ |
| २ | श्री. लखमा पागी | दूध काढणे | - |
| ३ | श्री. शंकर विक्या उंबरसाडा | चारा कापणे | - |

## ✻ वसतीगृहाशी संबंधित कर्मचारी ✻

| अनु. | नाव | पद | दूरभाष क्र. |
|---|---|---|---|
| १ | श्री. विलास लक्ष्मण मेढा | सह व्यवस्थापक | ७७६९०५०८४९ |
| २ | श्रीमती रंजना ठाकरे | सह व्यवस्थापिका | ७७९८४५८७३३ |
| ३ | सौ. मंजू शंकर उंबरसाडा | आचारी | - |
| ४ | सौ. संगिता रत्ना दुमाडा | आचारी | - |
| ५ | श्री. शंकर सोन्या आंबात | आचारी | - |
| ६ | श्री. सुनिल साठे | आचारी | - |
| ७ | श्री. सतिश विनायक रेंगे | स्वच्छता | ७२७६५१७७३९ |

## ✻ कार्यकर्ते ✻

| अनु. | नाव | पद | दूरभाष क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री. विठ्ठल किशनराव नारागुडे | संघठन | ८८०५७८०४८५ |
| २. | श्री. महेश रामा ठाकरे | कार्यालय | ७७९८३७८५८७ |
| ३. | श्री. सुरेश बाबू मोर | शेती | ८८०६४४२६०१ |
| ४. | श्री. संगिता सुरेश मोर | शेती | - |
| ५. | श्री. भद्रेश मणिराम वझे | शेती | ८२३७४३४७३ |
| ६. | श्रीमती संगिता राम वासवानी | मुंबई कार्यालय | ०२२-२३०५०३९३ |
| ७. | श्री. जयेश काकड्या खेवरा | संगणक विभाग | ८४१२०७५९५६ |

## ❖ पत्रवन ❖

**(वर्षप्रतिपदेला सर्व देणगीदारांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा वसतिगृहातील मुलेमुली वारली चित्र स्वहस्ते काढून पाठवतात. देणगीदार त्या मुलांच्या नावे पत्र पाठवतात. अशी ही पत्र-**

कु. मोनिका नारले

तू दिनांक मार्च २०१५ रोजी पाठवलेले नववर्ष शुभेच्छांचे पत्र मिळाले. मला खूप आवडले. धन्यवाद!

तुझ्या भविष्यातील प्रगतीसाठी खूपखूप शुभेच्छा!

पत्र मार्चमध्येच मिळाले. परंतु मी आजारी असल्यामुळे उत्तरास विलंब झाला. क्षमस्व!

**-श.गं.पटवर्धन, पुणे**

कु. कल्पेश ठाकरे

तुझ्या शुभेच्छा मिळाल्या आनंद वाटला. तू आणि तुझ्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना नववर्षाच्या शुभेच्छा! धन्यवाद!

**-विवेक म. करवीर-बोईसर**

आपल्या प्रकल्पातील एक विद्यार्थी चि. अजय गोविंद राऊत याने रेखाटलेले नववर्ष शुभेच्छाकार्ड मिळाले. त्यावरील रेखाचित्र अतिशय उत्तम असून वनवासी बांधवांच्या निसर्गासमवेत घालवित असणाऱ्या जीवन क्रमाचे उत्कृष्ट चित्रण आहे.

चि. अजय यास पुढील आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा

**-अरुण बंगाली, डोंबिवली पूर्व**

कुमारी निकीता खुलात

तू पाठविलेले नववर्ष दिनाचे शुभेच्छा पत्र मिळाले. आमच्या वसतिगृहातील मुलांकडून आणि माझ्याकडून तुमच्या वसतिगृहातील मुला-मुलींना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-शि.पु.गोखले तारळे**

आपल्या प्रकल्पातील एका विद्यार्थ्याने पाठवलेले पाडवा शुभेच्छा कार्ड आजच मिळाले. त्यामुलाला आम्ही रु. १०१/- बक्षीस देऊ इच्छितो तसेच आपल्या वनवासी विकास प्रकल्पाला रु. १०००/- देऊ इच्छितो.

**-जयंत मो. भागवत, डोंबिवली (पूर्व)**

कु. वैष्णवी ठाकरे

तुझे नववर्षाभिनंदनम् चे पत्र मिळाले. कार्डावर तू सुरेख असे खेड्यातले सकाळचे दृश्य रेखाटलेस ते खूप काही सांगणारं आहे. सूर्योदय, पक्ष्यांच्या भराऱ्या, खजरीचे झाड, डोक्यावर हंड्याची दूड घेतलेली मूलगी, कोंबडी, तिची पिले सारं सजीवच. वारली चित्रं शैलीतलं आकर्षित करणारं आहे. भारतीय संस्कृती संवर्धनासाठी तुम्ही मुले प्रगतीपथावर जात रहा हाच आशीर्वाद

**-लक्ष्मण ढ. टोपले, विक्रमगड**

तू पाठविलेलं वारली चित्र रेखाटलेलं शुभेच्छा पत्र मिळाले. चित्रातील हालचाली गतीमान असून त्यातून आनंदोल्हास प्रकट होत असल्याचे दिसते. सारेच जीवनानंदाचा उपभोग घेत आहेत. तुझं चित्र मला आवडलं. तूही अशीच आनंदोल्हासात राहा. तूझं ही जीवन असंच गतीमान अन् प्रगतीशील राहो हाच आशीर्वाद

**-लक्ष्मण ढ. टोपले, विक्रमगड**

आपके द्वारा प्रेषित नववर्ष की शुभकामनाओं का बधाईपत्र मा. भय्याजी जोशी के नाम से प्राप्त हुआ। उनके प्रवासपर होने के कारण उनकी ओरसे हार्दिक धन्यवादसहीत आपको भी पावन पर्वकी बधाई ।

**-रामनारायण, प्रधान कार्यालय सहसचिव, नागपूर**

प्रिय अमित,

तुझे नववर्ष शुभेच्छा देणारे अतिशय सुंदर सचित्र पत्र माझ्या पत्यावर पोचले आहे. हे पत्र वाचल्यानंतर तसेच या पत्रावरचे तू काढलेले चित्र पाहिल्यावर अत्यंत आनंद झाला. अशा सुंदर पत्राबद्दल मनःपूर्वक धन्यवाद!

तुझ्या जवळ चित्र काढण्याचे अप्रतिम कौशल्य आहे. तेव्हा या कौशल्याचा पूर्ण विकास होऊन एक उत्कृष्ट चित्रकार म्हणून तुझ्या नावलौकीकात भर पडावी ही शुभेच्छा!

**-अशोक मोडक, पवई**

**ज्या तळ्यातले पाणी पिण्यासारखे नसते त्या तळ्यातच भरपूर पाणी असते. उदार नसलेल्या माणसाजवळच पुष्कळ संपत्ती साठलेली दिसते.**

९ मार्च २०१५ या दिनांकाची कुमार अंकित धनजी भोये (इ. ८वी) आणि लेखा यादव यांचे कडून आलेली पत्रे गेल्या आठवड्यात पोहोचली. त्याबद्दल त्यांचे आभार आणि चित्रांच्या सुबकतेबद्दल मनापासून कौतूक!

वारली आर्ट म्हणून ज्याला संबोधले जाते त्यात हे विद्यार्थी पारंगत आहेतच. पण त्यांनी आता त्यांच्या चित्रांतून विविधता आणली पाहिजे असे वाटते. वृक्षांचे विविध प्रकार असतात ते पण चित्रांतून दिसले पाहिजेत.

**-र.शं.गोखले, डहाणू**

---

चि. विक्रम यास

तू पाठविलेले शुभेच्छा पत्र नुकतेच मिळाले. आणि खूप आनंद वाटला. प्रत्यक्षात आपला परीचय नाही.

भावी आयुष्यात उत्तम शिक्षण घेऊन तू स्वतःचा विकास करावा. आणि आपल्या मातापित्यांचे व समाजाचे ऋण फेडावेस हीच प्रभूचरणी प्रार्थना.

**-दत्ताकाका जोशी, भोर, पुणे**

---

चि. राजू कुरकुटे

तुझे ११ मार्च २०१५ चे नूतन शुभेच्छांचे कार्ड मिळाले. आनंद वाटला.

कार्डावरील वारली आर्ट मनोवेधक आहे. छान जमले आहे. यात आणि अन्य शैक्षणिक वाटचालीत तुझी अशीच प्रगती होवो. हा शुभाशीर्वाद! शक्य झाले तर तू एखाद्या दुसऱ्या विद्यार्थ्याला ही ड्रॉईंग कला शिकव.

**-शंकरराव थत्ते, पुणे.**

---

आपल्या संस्थेने नववर्षाचे शुभेच्छापत्र पाठविले ते मिळाले. शुभेच्छेबद्दल आपले आभार! मी संस्थेला दोन वर्षापूर्वी भेट दिली होती. माझ्याबरोबर स्व. श्री. दाभोळकरांच्या अंनिसचे कार्यकर्ते होते. त्यांनी हातचलाखी आणि जादू करुन बूवालोक लोकाना कसे फसवतात त्याची माहिति आश्रमातल्या मुलांना आणि संस्थेच्या कर्मचाऱ्यांना करुन दिली होती.

**-प्रभाकर वि. सावंत, बोईसर.**

---

आपण सर्वजण करत असलेल्या समाजसेवेच्या कार्यात हातभार लावण्याची इच्छा आहे. लवकरात लवकर सदर प्रकल्पास भेट देण्यास येऊ.

**-सौ. स्वाती जयवंत, दादर.**

*हार्दिक शुभेच्छा!*

**आरती कोल्ड्रींक्स**

ठाकोरभाई पटेल

❄ ❄ ❄

तळासरी - ४०१६०६, जि. पालघर.

*हार्दिक शुभेच्छा!*

**ममता जनरल स्टोअर्स**

❄ ❄ ❄

तळासरीनाका, तळासरी-४०१६०६, जि. पालघर.

*हार्दिक शुभेच्छा!*

**श्री. दिलीपभाई पटेल**

**किराणा मालाचे व्यापारी**

आणि

**आईस्क्रीम सेंटर**

तळासरी नाका, तळासरी ४०१ ६०६, जिल्हा पालघर.

*हार्दिक शुभेच्छा!*

**बजरंग स्वीट मार्ट**

ळासरी नाका, तळासरी-४०१६०६, जि. पालघर

# शालांत परीक्षा मार्च २०१५ निकाल!

माध्यमिक विद्यालय या प्रकल्पाच्या आवारात चालणाऱ्या शाळेचा निकाल यावर्षी (इयत्ता १०वी) ८६.२१% लागला आहे.



**प्रथम क्रमांक :**
कुमार सुहास गजभिये
८९%



**द्वितीय क्रमांक :**
कुमारी प्रिया ओढ
८०.८०%



**द्वितीय क्रमांक**
कुमार विक्रम राबड
८०.८०%

## ❖ वनवासी विकास प्रकल्पाच्या आगामी योजना ❖

✦ बालोद्यान ✦ श्री रामायण परीक्षा विस्तार योजना ✦ नक्षत्रउद्यान ✦ वसतिगृहातील सर्व मुलामुलींच्या घरी संपर्क ✦ हिन्दू मेळावे ✦ जनजाती प्रमूख बैठक ✦ गोमय, गोमूत्र उत्पादन ✦ गांडूळखत निर्माण ✦ इ वनसखा ✦ प्रकल्प संचालन समिती ✦ नववर्ष स्वागत यात्रा ✦ विद्यार्थी-विद्यार्थिनींचा वक्तृत्वविकास, संस्कृतपरिचय, शेती-रोजगार मार्गदर्शन स्वावलंबन योजना ✦ परिसर अध्ययन केन्द्र ✦ स्पर्धापरीक्षा केन्द्र ✦ जलकुम्भ ✦ दगडी अथवा सिमेंटचे कुंपण ✦ सेवापर्यटन केन्द्र

### वनवासी विद्यार्थी वसतिगृह इयत्ता १०वी निकाल

९५.८६% : २४ विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थी उत्तीर्ण.
**प्रथम :** कुमार विक्रम संपत राबड ८०.८०%
**द्वितीय :** कुमार सचिन शंकर चिमडा ७५%

### वनवासी विद्यार्थिनी वसतिगृह इयत्ता १०वी निकाल

९१.६६% १२ विद्यार्थिनींपैकी ११ विद्यार्थिनी उत्तर्ण
**प्रथम :** कुमारी आशा सुरेश रिंजड ७१%
**द्वितीय :** कुमारी प्रिया इश्वर जाधव ७०%


तमसो मा ज्योतिर्गमय

## शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन ब्राह्मण संस्था

'याज्ञवल्क्य' सहजानंद चौक, आग्रा रोड, कल्याण - ४२१३०१. दुरध्वनी : २३२१४५६
(रजि. नं. ए/६८१/ठाणे/१९७२)

**।। सर्व प्राणीमात्रामध्ये मित्रभाव जागृत होवो व परस्परांना निर्वैर अशा मित्रत्वाच्या दृष्टीने पाहो. - यजुर्वेद ।।**

| अध्यक्ष/पदसिद्ध विश्वस्त | कार्यवाह | कोषाध्यक्ष | कार्यकारी विश्वस्त |
|---|---|---|---|
| **दिलिप शामराव बल्लाळ** | **श्रीनिवास पुराणिक** | **प्रा. बिपीनचंद्र वाडेकर** | **डॉ. सुरेश एकलहरे** |
| ७५०६०९९९५१ | दूरध्वनी : २३११३११ | दूरध्वनी : २२०९१८ | दूरध्वनी : २२०३११९ |

### आमचे समाजाभिमुख उपक्रम

★ विद्यार्थी गुणगौरव (१०वी शालांत परीक्षा)
★ सामुदायिक श्रावणी
★ गुरूपौर्णिमा उत्सव
★ संस्था वर्धापन दिन
★ सामुदायिक तर्पण (सर्वपित्री अमावास्या)
★ लक्ष्मी कुबेर पूजन
★ दिवाळी पहाट
★ श्रीज्ञानेश्वर कीर्तन महोत्सव
★ वैद्यकीय शिबीर
★ भोगी (खास महिलांसाठी प्रबोधनात्मक कार्यक्रम)
★ स्नेहसंमेलन (के.जी. टु पी.जी. सत्कार, विविध गुणदर्शन, अमृतमहोत्सवी सत्कार)
★ योगीश्वर याज्ञवल्क्य जयंती (वेदपठण)
★ अर्थविषयक कार्यक्रम (गुंतवणूक, अर्थसंकल्प)
★ नववर्ष स्वागतयात्रा - गुढीपाडवा.
★ सामुदायिक मौंजी
★ "याज्ञवल्क्य पुरस्कार" कै. सुशिलाबाई एकलहरे महिला पुरस्कार (द्वैवार्षिक)
★ याज्ञवल्क्य संगीत कला अकादमीचे विविध अभ्यासक्रम (सर्व वयोगटासाठी)
★ याज्ञवल्क्य सभागृह विविध कार्यक्रमांसाठी उपलब्ध
★ सर्वांना हार्दिक सुभेच्छा! कार्यकारी मंडळ, विश्वस्त मंडळ व कार्यालयीन व्यवस्थापन


**मुर्खापुढे शास्त्रचर्चा व्यर्थच**

# कै. महादेव सावजी अंधेर - सूत्रकार

जन्मतः अपंग परंतू मेहनत आणि जिद्दीच्या बळावर पंगूपणावर विजय मिळवून सन १ मार्च १९५९ रोजी आंब्याच्या झाडाखाली शाळेची स्थापना करुन वनवासी पाड्यातील मुलामुलीना ज्ञानार्जनाची दारे खुली करुन दिली. आज सर्वत्र 'अंधेरगुरुजी' म्हणून ओळख झालेली आहे. हा अंक त्यांना समर्पित करण्यात आला आहे. त्यांचा अल्प परिचय :-

- ✦ १४ फेब्रुवारी १९३९ - : अपंग अवस्थेत जन्म
- ✦ १९५० : शाळेत नाव दाखल
- ✦ १९५४ : ४ थी उत्तीर्ण
- ✦ १९५८ : प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण
- ✦ १ मार्च १९५९ : शाळा सुरु केली.
- ✦ १ मे १९६० : महाराष्ट्र विद्यामंदिर असे नामकरण
- ✦ डिसेंबर १९६२ : अनूदानासहीत मान्यता मिळाली.
- ✦ २६ एप्रिल १९६२ १ लग्नसमारंभ
- ✦ १९९४-९५ : ५वी ते ७वीला मान्यता
- ✦ २ ऑगस्ट २०१४ : मृत्यू

## अंधेर गुरुजींना मिळालेले पुरस्कार

➙ ३० एप्रिल १९९७ : कै. माधवराव काणे समाजसेवा प्रथम पुरस्कार आणि मानपत्र कल्याण ज.स.बँकेतर्फे मिळाले.

➙ २९ सप्टेंबर २००६ : महाराष्ट्र शासनाचा आदिवासी सेवा पुरस्कार मा. श्री. विजयकुमार गावित आणि गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्या हस्ते मिळाला.

➙ अतिथि ऋणमोचन निधी - गोवा या संस्थेतर्फे समाजसेवा पूरस्कार स्मृतिचिन्ह आणि मानपत्र १९९७ रोजी मा. दत्ताजी राणे यांचे हस्ते देण्यात आला.

➙ महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री. शंकरराव चव्हाण यांच्याशी भेट मुंबईमधे!

➙ सन १९७८ रा. स्व. संघाचे तत्कालीन सरसंघचालक स्व. पूजनीय बाळासाहेब देवरास यांची महाराष्ट्र विद्यामंदिर सूत्रकार शाळेला भेट दिली.

➙ अंधेर गुरुजींच्या जीवनावर 'माणूस' या माहितीपटाचे निर्माण करण्यात आले.

➙ भारत सरकारतर्फे साहित्य अकादमी भाषा सन्मान पुरस्कार २०१३-१४ अंधेरगुरुजीना मरणोत्तर देण्यात आला. ५ ऑक्टोबर २०१४ रोजी तिरुअनंतपुरम केरळ येथे रुपये १ लाख, स्मृतिचिन्ह असा पूरस्कार गुरुजींच्या मूलाने विजयने स्वीकारला.

➙ छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण तर्फे समाजसेवा आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचा गौरव झाला.

➙ उत्तम लेखनासाठी दिला जाणारा पु. भा. भावे समाजसेवा पुरस्कार, स्मृतिचिन्ह २००२ साली मिळाले.

## कै. अंधेर गुरुजींची ग्रंथसंपदा

- ✦ आम्ही आदिवासी वारली
- ✦ वारली भाषेतील लोककथा
- ✦ देवदर्शन
- ✦ एका अपंगाची कहाणी - आत्मचरित्र

# तळासरी : सेवा पर्यटन

पुर्वी तीर्थाटन होते. आता पर्यटन म्हणू लागलो. पर्यटनामधे कृषि पर्यटन, धार्मिक पर्यटन असे नवनवीन प्रकार येऊ लागले आहेत. तसाच एक प्रकार आहे.

## सेवा पर्यटन

आपण सारे डोक्यापासून पायापर्यंत मॅचिंगचा विचार करतो. तसाच सामाजिक मॅचिंगचा विचार पण नको का करायला? असा विचार जिथं सुरु झाला आहे. ते सारे सेवाप्रकल्प म्हणजे आधुनिक तीर्थस्थानच! म्हणून आपणा साऱ्यांना हे खास निमंत्रण! तळासरी प्रकल्पाला भेट द्या आणि परिसरातील अनेक विविध स्थाने पहा.

### ❖ तळासरी परिसरात काय पहाल?

✦ कै. माधवराव काणे यांच्या वास्तव्याने आणि परिश्रमाने विस्तारलेला तळासरी प्रकल्प.
✦ इस्कॉनचे हरे कृष्ण मंदिर ✦ कुर्झे धरण
✦ दापचरी येथील रबर निर्माण प्रक्रिया केंद्र
✦ वारली चित्रकला ✦ तारपा नृत्य
✦ फुलपाखरु उद्यान, खानवेल
✦ प्रकृती परिचय केन्द्र, खानवेल
✦ वनवासी वस्तू संग्रहालय, सेल्व्हास
✦ वनवासी कल्याण आश्रम मोठा रांधा येथे सूर्या प्रकल्प.
✦ नक्षत्र वन ✦ लायन सफारी
✦ हरीण पार्क ✦ दमण
✦ श्री महालक्ष्मी मंदिर ✦ ग्राम बाल शिक्षा केंद्र, कोसबाड
✦ बोर्डी, डहाणू येथील समुद्र किनारा!
✦ तळासरी परिसरामधे बांगडीचा डोंगर, काजळीचा डोंगर, शेवग्याचा डोंगर, बारडाचा डोंगर आणि गंभीरगड!
✦ नेहमीची तीच तीच स्थाने पाहून कंटाळा आला असेल तर या तळासरीला आणि पहा ही सर्व ठिकाणं!
✦ तळासरी प्रकल्पात निवासी सोय आहे.
✦ जवळची रेल्वे स्थानके डहाणू, उंबरगाव
✦ मुंबई चर्चगेट ते डहाणू थेट लोकलसेवा.

**संपर्क :** श्री. शशांक अभ्यंकर गिरगाव दूर ९८२००२८६४१
श्री. किशोर वझे, गिरगाव. दूर ९२२३५५८८६३

## ❖ आवाहन ❖

**पितृ पंधरवडा**

यावर्षी सोमवार दिनांक २८ सप्टेंबर ते सोमवार दिनांक १२ ऑक्टोबर २०१५ या काळात पितृपंधरवडा येत आहे. आपल्या पूर्वजांच्या स्मृत्यर्थ कालानुरुप बदल करीत अशा सामाजिक संस्थेला देणगी दिल्यास ते उचित ठरेल असे वाटते.

✦ **तळासरी प्रकल्पासाठी आपण खूप काही करू शकाल त्यासाठी हे वाचा.**
➻ प्रथम प्रकल्पाला स्वतः भेट द्या तसेच नातेवाईक, परिचित, विशेष व्यक्ती यांना प्रकल्प भेटीसाठी घेऊन येणे.
➻ प्रकल्पाचे प्रचार साहित्य-त्रैमासिक वनसखा, पत्रक आदी सोबत ठेवून लोकांशी संपर्क करून देणे. सुखदूःखाचे प्रसंगी निधी देण्यासाठी लोकांना प्रवृत्त करणे.
✦ अभ्यासक्रमातील विषय, क्रीडा, कला, कौशल्य अभियांत्रिकी किंवा अन्य काहीही! प्रकल्पामध्ये येऊन मुलामुलींना शिकवणे.
✦ घरामधील शैक्षणिक, क्रीडा साहित्य, फर्निचर, सायकल आदी साहित्य इथे मुलामुलींना उपयुक्त ठरेल.
✦ (शक्यतो तांदूळ, गहू सोडून) कडधान्य, डाळी, साखर, तेल, आदी धान्यरुप मदत आपण करू शकता.

## ❖ आमच्या योजना ❖

| | |
|---|---|
| ✦ एका विद्यार्थ्याचा वार्षिक खर्च | रू. ६,०००/- |
| ✦ एका वेळचे गोड जेवण | रू. ४,०००/- |
| ✦ एक वेळचे साधे जेवण | रू. ३,५००/- |
| ✦ एका विद्यार्थ्याचा शैक्षणिक खर्च | रू. २,०००/- |
| ✦ एका गणेशोत्सवाचा खर्च | रू. १,०००/- |
| ✦ एका गायीचा खर्च (मासिक) | रू १०,०००/- |
| ✦ चाऱ्याचा (दैनिक) खर्च | रू. २,०००/- |

देणगीसाठी 'वनवासी विकास प्रकल्प' या नावाने धनादेश (चेक) काढावा. ८०जी सवलतीसाठी 'वनवासी कल्याण केंद्र' या नावाने धनादेश काढावा.

भिक्षुक किवा याचक दुसऱ्या भिक्षुकाला किंवा याचकाला पाहून कुत्र्याप्रमाणे गुरगुरु लागतो.

**With Best compliments From:**

Haresh S. Shivade 9890227557 8237676786

**SHREE SHIDDHI VINAYAK TRADERS**

STOCKIST OF : Ultratech Cement, Ambuja cement, Snestor Cement A.C.C. Cement, J.P. Cement, Binine Cement, Neru, Window, Ceramic Items.

DEELERSHIP : VISAKA, A.C.SHREET & SWASTICK A.C. SHEETS

Shop No. 323, TALASARI, Umbergaon Road, Tal.Talasari, Dist. Palghar - 401606.

हार्दिक शुभेच्छा !

**श्री. राजेन्द्र उदयनाथ शाह**

तळासरी नाका,
तळासरी - ४०१६०६, जि. पालघर.

हार्दिक शुभेच्छा !

**योगी सिडस् ॲन्ड ॲग्रो सेंटर**

बी-बियाणे खताचे अधिकृत विक्रेते

**जगदीश पटेल**

तळासरी (सुतारपाडा) उंबरगाव रोड, ता. तळासरी जि. पालघर.
दूरध्वनी : ०९०४९१०११४४, ०९४२३०९०३२५, ०९४२१५४६६२९, ०७८७५४३२२४४

हार्दिक शुभेच्छा !

**प्रिया आर्टस !**

सर्वप्रकारची पेंटींगची कामे केली जातील

**श्री. रमेश महाजन (सर)**

विकासपाडा, तळासरी-४०१६०६, जि. पालघर.
दूरध्वनी : ९४२१६२५९४९

हार्दिक शुभेच्छा !

प्रो.प्रा. जयकुमार प्रजापती 9970561112
बाबुलाल प्रजापती 02521-220665 9823441011

**न्यु महावीर जनरल स्टोर**

ऑईल पेन्ट, चुना, नीरु, स्नोसेम, डिस्टेंबर, फूटवेअर, हार्डवेअर, स्टेशनरी, एशियन पेन्ट, तथा इलेक्ट्रीक आयटम, बर्तन के व्यापारी
मु.पो. तळासरी, (उंबरगाव-संजानरोड) ता. तळासरी, जि. पालघर-४०१६०६.

हार्दिक शुभेच्छा !

**मे. अलंकार जनरल स्टोअर्स**

हार्डवेअर, फुटवेअर, स्टेशनरी, जनरल स्टोअर्स

पटेल बिल्डिंग, तळासरी.
दूरभाष क्र.: ९२७२६६६९३४/९९२३९००७३७

**श्री. जयेश दिलीप ठक्कर**

जय जलाराम फर्निचर मार्ट ॲण्ड इलेक्ट्रोनिक

**श्री. काळूराम राठोड, कटलरी आणि कपड्याचे व्यापारी**
**भगवती हेअर कटींग सलून, तळासरी**

**हितचंतक - तळासरी**

हार्दिक शुभेच्छा !

**मे. पन्नाराम सारस्वत**

किराणा मालाचे व्यापारी

आशागड, ता. डहाणू, जि. पालघर
दूरध्वनी : ९७६५२०८३१४, ९२७०५२५६०५

धावताना मधेच घोड्याने मारलेली उडी, ढगाची गर्जना, स्त्रियांची लहर, पुरुषांचे भाग्य, पाऊस न पडणे तसेच तो पाऊस फार होणे ह्या गोष्टी देवालाही कळत नाहीत. मग मनुष्यांना त्या कोठून कळणार ?

## ❖ नोंद ❖

### अप्पा जोशी नागरी पुरस्काराचे मानकरी

डोंबिवली शहरात आपापला उद्योगव्यवसाय इमानेइतबारे करीत असतानाच सामाजिक बांधिलकी मानून जी मंडळी शहरासाठी, शहरातल्या सार्वजनिक जीवनासाठी कार्यरत राहिली आहेत त्यांचे या शहरावरचे ऋण मोठे आहे. त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी नव्हे, परंतु त्यांच्या कार्याचा आदर्श पुढल्या पिढ्यांपुढेही राहावा आणि त्यातून स्फूर्ती घेत सामाजिक बांधिलकी मानणारी, गावकीचे भान राखणारी तरुण कार्यकर्त्यांची नवी फळी तयार व्हावी या उद्देशाने २०१४ पासून डोंबिवलीतील २६ संस्थांनी एकत्र येऊन नागरी सत्कार समिती स्थापन करुन, नागरी सत्कार करण्याचा उपक्रम सुरु केला. रविवार, दिनांक १० मे २०१५ रोजी डोंबिवलीत या वर्षीचा हा नागरी सत्कार सोहळा झाला. एकूण सहा जणांचा सत्कार करण्यात आला. यामधे तळासरीसारख्या वनवासी क्षेत्रात तीन दशके काम करताना समाजकंटकानी केलेल्या हल्यात डोक्याला १४४ टाके पडूनही ठामपणे आजही सक्रीय असलेल्या आप्पा जोशींचा सत्कार करण्यात आला. श्री. आप्पा जोशींचे अभिनंदन!

### आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत नंदुरबारच्या किसन तडवीला सूवर्णपदक

अक्कलकुवा तालुक्यातील बर्डी येथील किसन तडवीने दोहा (कतार) येथील आशियाई युवा ॲथलॅटिक्स स्पर्धेत सूवर्णपदक मिळविले. या स्पर्धेत किसन तडवीने ३००० मीटरच्या शर्यतीत ८ मिनिटे २६.२४ सेकंदात हे अंतर पार करुन सूवर्णपदक पटकावले. किसन तडवीची ही कामगिरी त्याला कोलंबिया येथे होणाऱ्या जुलै महिन्यातील जागतिक युवा ॲथलेटिक्स स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघाच्या निवडीत उपयोगी ठरणारी आहे. नाशिक येथील विजेंदर सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली किसन तडवीने सराव केला. भोसला मिलिटरी स्कूलचा विद्यार्थी असलेला किसन अकरावी उत्तीर्ण विद्यार्थी आहे. खान्देशात क्रीडा क्षेत्रात फारसे प्रोत्साहनाचे वातावरण नसताना एका वनवासी तरुणाचे हे यश प्रेरणादायी आहे.

## ❖ अभिनंदन ❖



माध्यमिक विद्यालयातील एक शिक्षक श्री. दिपक पाटील यांनी सरकारी वेतन मिळत नसतानाही इयत्ता १०वीचे पेपर विनामोबदला तपासून दिले. याची महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने विशेष दखल घेऊन त्यांना मानपत्र दिले.

"निष्काम सेवेतून जीवनात खरा आनंद आपण मिळवित असल्याची यावरुन प्रचिती येते. पेशा आणि व्यवसाय/नोकरी या शब्दातील महत्वाचा फरक आपण आपल्या कृतीतून सिद्ध केला आहे. आपले विचार आणि कृती निश्चितच कौतुकास्पद आहे. निरागस विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शिक्षण मंडळ करीत असलेल्या प्रयत्नात आपण दिलेल्या योगदानाबद्दल आपले आर्दिक अभिनंदन!"

## ❖ वाचावे असे काही ❖

**रानबखर** आदिवासींच्या जीवनसंघर्षाचे पदर
लेखक मिलिंद थत्ते
समकालिन प्रकाशन
किंमत १०० रु. पृष्ठ ९५

आदिवासी म्हणजे 'रानातले राजे' अशीच आजवरची रुढ प्रतिमा. पण गेल्या पंचवीस तीस वर्षात आदिवासींच्या जगण्याचे अनेक कंगोरे समोर येत आहे. त्यात कुपोषणापासून विस्थापनापर्यंत आणि स्वशासनापासून ते नक्षलवादापार्यंत अनेक बाबी आहेत. मग, आदिवासींचं हे आजचं जगणं कसं आहे? त्यांचे खरे प्रश्न काय आहेत? त्यांच्या कष्टमय जगण्याचा फास सुटावा, यासाठी काय प्रयत्न चालले आहेत? मायबाप सरकारच्या धोरणांमुळे त्यांच्या जगण्यावर काय परिणाम होतो आहे?

गेली १०/१२ वर्ष नाशिक-ठाणे नंदुरबार या पट्ट्यातील आदिवासींसोबत त्यांच्यातलाच एक बनून राहिलेल्या आणि त्यांच्याच नजरेतून त्यांची सुख-दुःख बघण्याचा प्रयत्न करण्याऱ्या एका कार्यकर्त्याने सांगितलेली ही रानबखर

मूर्खांची जेथे पूजा होत नाही, तेथे धान्य चांगले साठविलेले असते आणि जेथे नवराबायको भांडत नाहीत तेथे लक्ष्मी स्वतःच येऊन रहाते.

## ❖ निधी संकलक ❖

| अ.क्र. | नाव | संपर्क पत्ता | दूरभाष क्र. |
|---|---|---|---|
| १ | वनवासी कल्याण केंद्र | डहाणू | ०२५२८-२२०७६४ |
| २ | श्रीमती संध्याताई करंदीकर | डहाणू | ०२५२८-२२२४२७ |
| ३ | श्री. राजेंद्र केळकर | डहाणू | ०२५२८-२२२७६५/९४२२६७७८२५ |
| ४ | श्री. रमेशचंद्र शुक्ल | डहाणू | ९३७२६८३२६२ |
| ५ | श्री. वसंत सुशील शहा | डहाणू | ९२२४२५०८०७ |
| ६ | श्री. दिलीप करवीर | बोईसर | ०२५२५-२७४१४०/९४२३०८१०१२ |
| ७ | श्री. धनंजय संखे | बोईसर | ९३७०१५१४०४ |
| ८ | दुर्गा मेडिकल स्टोअर्स | विरार | ०२५०-३२५५९१२/९३२६४६६१०६ |
| ९ | डॉ. श्री. संजय पेवेकर | वसई | ०२५०-२४६०७५२/९८५०२५१५४६ |
| १० | श्री. किशोर थिटे | भाईंदर | ०२२-२८१७०२०७/९८६९५२३१०१ |
| ११ | श्री. महेशभाई भट | भाईंदर | ०२२-२८१८५८२८ |
| १२ | श्री. आशिष गोखले | भाईंदर | ९८९२५५१५५२ |
| १३ | श्री. श्रीराम ओक | मालाड | ९८३३१७८७२९ |
| १४ | श्री. विनय सोमण | अंधेरी | ०२२-२६८३४१८९ |
| १५ | श्री. शशिकांत जोशी | अंधेरी | ९८२१३२००७९/०२२-२६८३७३८४ |
| १६ | श्री. श्रीनिवास गोगटे | पार्ले | ९८६९००२२८५ |
| १७ | श्री. योगेन्द्र वझे | सांताक्रुझ | ९८२११५०७४२ |
| १८ | श्री. योगेश रुपारेल | वरळी | ९३२३०२४४२३ |
| १९ | श्री. माधव बर्वे | गिरगाव | ९२२३३००३५० |
| २० | श्री. किशोर वझे | गिरगाव | ९८६९०५८८६३ |
| २१ | वनवासी विकास प्रकल्प | ग्रँटरोड | ०२२-२३०५०३९३ |
| २२ | विहिंप कार्यालय | ठाणे | ०२२-२७३७८१८९ |
| २३ | सौ. जास्वंदी मकरंद पिंपुटकर | पुणे | ८६९८०५३२१४/८६९८०५३२१५ |
| २४ | श्री. शंकर ज. थत्ते | पुणे | ०२०-२४४९२४४४ |
| २५ | श्री. सुरेश फाटक | डोंबिवली | ९८३३६६११०९ |
| २६ | श्री. मनोहर मुजूमदार | डोंबिवली | ०२५१-२४७२२०८ |
| २७ | सौ. सुनिता शैलेश घारपुरे | कासा | ९४२२४८५५९३ |

दुसऱ्याला दुःख न देता, दुष्टांपुढे न वाकता आणि सज्जनांनी स्वीकारलेला मार्ग न सोडता जे थोडे करु शकाल तेही पुष्कळच महटलं पाहिजे.

❖ बाहेरचे दिवे

# श्री. वसंत गणेश रानडे

**तळासरी प्रकल्पासाठी आस्थेने वर्षानुवर्षे निधी, वस्तू संकलन करणारे अनेक कार्यकर्ते सुदैवाने तळासरी प्रकल्पाला लाभले. अशा काहींचा हा परिचय करुन देणारे हे सदर**

माधवराव काणे यांनी १९६७ साली तळासरी येथे वनवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरु केले. तेव्हा त्या मागचा मूळ उद्देश वनवासी मुलांना उच्च शिक्षण घेण्यासाठी निवासाची व्यवस्था उपलब्ध करून देणे हा होता. गेल्या पंचेचाळीस वर्षात या प्रकल्पाने अनेक अंगांनी प्रगती केली आहे. हा प्रकल्प म्हणजे आता केवळ एक वसतिगृह न राहता रोजगार आणि व्यापार केंद्रही बनलेला आहे. शहरी व वनवासी या समाजामाध्ये एक अनावश्यक दरी निर्माण झालेली आहे. ही दरी खऱ्या अर्थाने नष्ट करायची असेल तर बंधूना केवळ शिक्षण देऊन भागणार नाही तर त्यांच्यात समाजोपयोगी क्षमता निर्माण केली पाहिजे. हा विचार या केंद्राने अमलात आणला आहे. हा विचार प्रत्यक्षात आणण्यात ज्यांचा मोलाचा सहभाग आहे त्यांच्यापैकी एक आहेत सध्या मुलुंड येथे वास्तव्यास असणारे वसंत गणेश रानडे.

वसंत रानडे यांचा जन्म ३ मार्च १९३९ रोजी मध्य प्रदेशातील जबलपूर येथे झाला. त्यांचे वडील रेल्वेत नोकरी करत. ते ज्या महाराष्ट्र हायस्कूलमध्ये शिकले, तिथले सारे शिक्षक आणि शाळासोबती संघस्वयंसेवक होते. साहजिकच त्यांचे ४ भाऊ व स्वत: वसंत रानडे हे सुद्धा संघाकडे ओढले गेले. लहानपणी प.पू. गोळवलकर गुरुजींच्या समोर देशभक्तीपर गाणी म्हणून दाखवण्याचे भाग्य त्यांना लाभले. १९५८ ते १९७३ या काळात त्यांनी भारतीय नौदलात नोकरी केली. सरकारी नोकरीच्या नियमांनुसार व सैन्यदलातील दंडकांप्रमाणे ते संघकार्यात भाग घेऊ शकत नसत पण या काळातही त्यांच्यावरील संस्कार कायम होते. जहाजावर असतानाही गुरूपौर्णिमेला ते सहकाऱ्यांकडून गुरूदक्षिणा गोळा करत असत. १९६५ व १९७१ च्या युद्धात नौसैनिक म्हणून त्यांनी भाग घेतला. नौदलातून निवृत्ती घेतल्यावर त्यांनी टाटा कन्सल्टसी सर्व्हीसेसमध्ये दीर्घकाळ नोकरी केली. या नोकरीच्या काळात त्यांनी अकाउंटस, फायनान्स व कंपनी लॉ विषयक उच्च शिक्षण घेतले. एकदा विश्व हिंदू परिषदेचे सचिव अशोक सिंघल यांची बहीण उषा जैन यांच्याकडे काही काळ वास्तव्य करायचा त्यांना योग आला. त्यांच्या मनातल्या संघ-हिंदुत्ववादी विचारांनी उचल खाल्ली व ते संघकार्यात परत सक्रीय झाले. आधी ते जनसंघाचे काम करत. १९८० मध्ये मिनाक्षीपुरम धर्मांतरण झाल्यावर मा. मुकुंदराव पणशीकर व शेषाद्री चारी यांच्या सुचनेनुसार त्यांनी विश्व हिंदु परिषदेच्या कार्याला सुरूवात केली.

विश्व हिंदू परिषदेचे हिशेब पूर्ण करणे. सायन येथील शिवकल्याण केंद्र हा प्रकल्प मार्गी लावणे वगैरे कामे त्यांनी सांभाळली. वि.हिं.प.चे विश्वस्त म्हणून त्यांची नेमणूक झाली. भास्करराव मुंडले, केशवराव केळकर, कृष्णकुमार यांच्यामुळे त्यांचा तळासरी प्रकल्पाशी संबंध आला. रामजन्मभूमी आंदोलनाच्या काळात तळासरी परिसरात रामज्योत घेऊन जाणे, भारतमाता यात्रा यामुळे या प्रकल्पाशी संबंध वाढला. नंतर काही गोष्टी त्यांच्या लक्षात आल्या. थेट विश्व हिंदू परिषदेचा प्रकल्प असल्याने त्या प्रकल्पाला देणग्या मिळवणे व सरकार दरबारातील कामांमध्ये अडचणी येत. तेव्हा वसंत रानडे यांनी सायन व तळासरी प्रकल्पांची नावे बदलून ती शिवकल्याण व वनवासी कल्याण केंद्र अशी करून घेतली. त्यासाठी आवश्यक घटनाबदल, नोंदणी वगैरे केले. वि.हिं.प. (महाराष्ट्र) व या प्रकल्पास आयकर कलम ८०जी अन्वये सवलती मिळवल्या फॉरिन एड ॲक्टखाली नोंदणी केली व परदेशातून मदत मिळवण्याचा मार्ग मोकळा केला. एवढेच नव्हे तर सात देशांतून या प्रकल्पासाठी देणग्या मिळवल्या. मुंबईतील व्यापारी व दानशूर व्यक्तींशी संपर्क

**मूर्खांची जेथे पूजा होत नाही, तेथे धान्य चांगले साठविलेले असते आणि जेथे नवराबायको भांडत नाहीत तेथे लक्ष्मी स्वतःच येऊन रहाते.**

साधून तलासरी प्रकल्पासाठी भरघोस देणग्या मिळवल्या. त्याच देणग्यांतून तळासरी प्रकल्पात व्यापारी केंद्र, मुलींचे वसतिगृह व रोजगार प्रशिक्षण केंद्र उभे राहिले. यातील प्रत्येक इमारतीला जवळपास ५० लाख रु. खर्च आला.

वसंत रानडे यांचे या प्रकल्पातील मोठे योगदान म्हणजे रोजगाराभिमुख शिक्षणाची दुष्टी हे होय. स्वत: वसंत रानडे हे नौदलात नोकरीला लागताना फक्त मॅट्रीक होते. नौदलातून निवृत्त झाल्यावर एवढ्या शिक्षणाच्या जीवावर आपल्याला सन्मानाची नोकरी मिळणार नाही हे त्यांनी ओळखले व आवश्यक ते अकाउंट्स व कायद्याचे उच्च शिक्षण घेतले. तळासरी प्रकल्पात शिकणाऱ्या वनवासी विद्यार्थ्यांजवळही व्यावसायिक कौशल्य असायला हवे अशी त्यांची तळमळ होती. नाहीतर ही मागासलेल्या घटकातील मुले पुढारलेल्या जगात मागे पडतील या दृष्टीने त्यांनी तळासरी केंद्रात व्यावसायिक शिक्षण सुरू केले. शहरातून तज्ज्ञ आणून त्यांची व्याख्याने - कार्यशाळा आयोजित केल्या. सुतारकाम, गवंडीकाम, इलेक्ट्रिशियन, शिवणकाम यांचे वर्ग सुरू केले. त्यामुळेच हा प्रकल्प आता एक रोजगार केंद्र म्हणूनही ओळखला जातो.

वसंत रानडे यांनी या प्रकल्पासाठी आपली स्वत:ची विश्वासार्हता पणाला लावली. स्वरुपचंद गोयल यांनी खूप मदत केली. घाटकोपर येथील गुजराथी-पटेल समाजानेही त्यांना सढळहस्ते मदत केली. ते देणगीदारांना आवर्जून ताळेबंद पत्रक दरवर्षी रवाना करत. केंद्रात घडणाऱ्या प्रत्येक घटनेची बातमी देणगीदारांना कळवत. निरनिराळी फोल्डर्स, उपक्रमांची माहितीपत्रके, दिवाळी शुभेच्छापत्रे असे साहित्य एकूण ३५०० देणगीदारांना नियमितपणे पाठवत. त्यांनी सर्व देणगीदारांना संस्थेशी बांधून ठेवले.

१३ नोव्हेंबर १९९७ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी या केंद्राला भेट दिली. या दिवशी आजुबाजूचे गावकरी, मिशनरी-ख्रिश्चन पाहुणे-सरकारी अधिकारी व पोलीस दल मिळून साडे आठ हजार लोक या केंद्रात जमले. त्या दिवसाच्या व्यवस्थेत वसंत रानडे यांचा मोलाचा सहभाग होता. मुख्यमंत्री दोन तासांसाठी या केंद्रात आले होते पण त्यांनी पूर्ण दिवस येथे घालवला. केंद्राबाबत मुख्यमंत्री म्हणाले की, मी आजवर तीन हजार प्रोजेक्टस् बघितले आहेत पण वनवासी कल्याण केंद्राच्या तलासरी प्रकल्पाइतका आदर्श प्रकल्प आजवर माझ्या पाहण्यात आलेला नाही.

या अभिप्रायाने वसंत रानडेंसारख्या अनेकांच्या कष्टांचे चीज झाले.

**(विश्व हिंन्दू परिषदेच्या स्मरणिकेतून साभार)**

❖ **विशेष लेख**

# श्री. महादेव जयराम तथा आप्पा जोशी

विश्व हिंदू परिषदेतर्फे संचालीत केला जाणारा तळासरी येथील वनवासी कल्याण केंद्र हा प्रकल्प सर्वपरिचित आहे. तो जणू मुंबईच्या वि.हिं. परिषदेची ओळख समजला जातो. वनवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी या उद्देशाने १९६७ साली मा. माधवराव काणे यांच्या प्रेरणेने येथे एक वसतिगृह सुरू झाले. आज हा प्रकल्प वसतिगृहाखेरीज रोजगारकेंद्र, जागरण केंद्र म्हणूनही ओळखला जातो. हा प्रकल्प नावारुपाला आणण्यासाठी अनेकांनी योगदान दिले आहे. काहीजणांनी आपले आयुष्य त्यासाठी खर्ची घातले आहे. त्यापैकीच एक आहेत सध्या डोंबिवलीत वास्तव्यास असणारे महादेव जयराम तथा अप्पा जोशी. त्यांनी तब्बल ३२ वर्षे या वसतिगृहाचे व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सांभाळली आहे.

अप्पा जोशी मुळचे देवरुखचे. बालवयातच ते संघ स्वयंसेवक बनले. त्यांचे सर्व बंधू रा.स्व. संघाचे स्वयंसेवक आहेत. मोठे बंधू व अप्पाही रायगड जिल्ह्यात प्रचारक होते. संघदृष्ट्या तृतीयवर्ष शिक्षित होत असतानाच त्यांनी शाळा शिक्षकाची नोकरी मिळण्याच्या दृष्टीने शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रमही पूर्ण केला. रायगडमध्ये त्यांनी दोन वर्षे शिक्षक म्हणून नोकरीही केली. दामूअण्णा टोकेकर यांनी त्यांना

**दुसऱ्याला दु:ख न देता, दृष्टांपुढे न वाकता आणि सज्जनांनी स्वीकारलेला मार्ग न सोडता जे थोडे करु शकाल तेही पुष्कळच महत्टलं पाहिजे.**

तळासरी प्रकल्पात माधवराव काणे यांना मदत करण्यासाठी जायची सूचना केली. तळासरी केंद्र हे विद्यार्थी वसतिगृह असल्याने माधवरावांना रोज रात्री मुक्कामाला वसतिगृहातच यावे लागे. अप्पा जोशींना इकडे पाठवण्यामागे दामू अण्णांची योजना अशी होती की वसतिगृहाला व्यवस्थापक मिळला तर माधवरावांना सरकारी कामे करणे, देणग्या गोळा करणे यासाठी मोकळीक मिळेल. त्यानुसार त्यांनी अप्पा जोशींना तळासरीला पाठवले. १९६९ साली अप्पा या प्रकल्पात सहभागी झाले. तेव्हा प्रकल्प तळासरी गावात भाड्याच्या जागेत चालायचा. प्रकल्प म्हणजे फक्त काही झोपड्या होत्या. वीज, पाणी वगैरे सोयी नव्हत्या. तेव्हा २५ विद्यार्थी होते.

त्यानंतर १९७३ साली मुलींचे वसतिगृह सुरू झाले. त्यावर एक स्त्री व्यवस्थापिका पाहिजे होती. तळासरीतील पाऊस, वारा, जंगल, साप यांमुळे तिथे स्त्री व्यवस्थापिका टिकेना. म्हणून माधवराव काणेंच्या सल्ल्यानुसार अप्पांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. दैवी संकेताने त्यांना अगदी अनुरूप सहधर्मचारिणी मिळाली. त्यांच्या पत्नी वसुधा यासुद्धा हिंगणे शिक्षण संस्थेत राहून शिकलेल्या होत्या. त्यामुळे वसतिगृहाचे वातावरण त्यांना नवीन नव्हते. तसेच त्याही शैक्षणिकदृष्ट्या योग्य असल्याने त्यांची वसतिगृह व्यवस्थापिका म्हणून नेमणूक करण्यात शासकीय नियमांनुसार अडचण नव्हती.

जोशी पती पत्नींनी ३० वर्षे या वसतिगृहातील मुला-मुलांची काळजी घेतली. त्यांना घराची आठवण होणार नाही याची दक्षता घेतली. वनवासी समाजातील मुलांनी या आश्रमात रहावे व शेजारच्या ठक्करबाप्पा विद्यालयात किंवा सरकारी शाळेत शिकावे अशी योजना होती. त्यानुसार मुलांचा दिनक्रम आखलेला असे. तो जोशी पती-पत्नी डोळ्यात तेल घालून अमलात आणत. त्यात शिस्त असे पण त्याबरोबरच कळकळही होती. विद्यार्थ्यांवर सतत चांगले, देशभक्तीचे व समाजसेवेचे संस्कार होतील असे त्यांनी पाहिले. जरी शिक्षण संपवून ती मुले नोकरीला लागली, स्वतंत्र झाली तरी निरनिराळ्या कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना आश्रमाशी बांधून ठेवले. या वसतिगृहातील माजी विद्यार्थ्यांशी कायम संबंध ठेवले. केंद्राच्या भाषेत या माजी विद्यार्थ्यांना दादा म्हणत. वसतिगृह सोडून गेलेले दादा सातत्याने वस्तीगृहात शिकणाऱ्या मुलांच्या भेटीला येत. हे घडवण्यात जोशी पती-पत्नींची मोठी भूमिका असे.

या केंद्राच्या एकूण प्रगतीत अप्पा व वसुधा जोशी या पती-पत्नींचा महत्वाचा वाटा आहे. ते दोघे या प्रकल्पाचा कणा होते. वनवासी मुले व शहरी समाज यांच्यातला दुवा होते. ३२ वर्षात या दोघांच्या देखरेखीखाली २००० वनवासी मुले-मुली शिकल्या व समाजाला आपले योगदान द्यायला समर्थ बनून बाहेर पडल्या.

या वसतिगृहाने खूप काही साधले आहे. या वसतिगृहात शिकलेले अनेक जण पुढे सरकारी नोकरीला लागले. गट विकास अधिकारी, पोलीस कमिशनर, शेतकी अधिकारी, शिक्षक बनले. काही मुली वकील, महिला पोलीस बनल्या. त्यापेक्षा महत्वाचे म्हणजे या आश्रमाने या भागातील ख्रिश्चन धर्मप्रसार रोखला. कम्युनिस्टांचा वरचष्मा कमी केला. वनवासी व हिंदू संस्कृतींत कमालीचे साम्य आहे. त्यांना आपल्या सांस्कृतिक वेगळेपणाची चांगलीच जाणीव आहे. ते सहजासहजी आपला धर्म सोडायला तयार नसतात. गरीबीमुळे ते धर्मांतर करतात. त्यांना शिक्षणाचा, प्रगतीचा मार्ग उपलब्ध करून दिला.

या भागातील जमीनदारी व्यवस्था आदिवासींना जगण्यापुरतेच अन्न द्यायची. त्याला पर्याय म्हणून लाल बावटा आला. साम्यवादी विचारसरणीला आदिवासी समाज शोषणापासून मुक्त होणे अभिप्रेत होते. पण त्यांना त्यांची पुढील प्रगती नको होती. जास्त शिकले तर ते आपल्याला डोईजड होतील या भीतीने साम्यवादाने त्यांची भौतिक प्रगती रोखली होती. वनवासी कल्याण केंद्राने संघाच्या संस्कारनुसार या समाजाला स्वत:च्या अभ्युदयाबरोबरच समाजाच्या विकासकार्यात योगदान देण्याची संधी उपलब्ध करून दिली. वनवासी व शहरी समाज त्यांतली दरी साधली. फार मोठा अभिनिवेश न आणता आपल्या साध्यासुध्या कामान्वये राष्ट्रकल्याण, समाजहीत व हिंदू धर्म रक्षण साधता येते हे दाखवून दिले. वनवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणले.

२००१ साली अप्पा जोशी तांत्रिकदृष्ट्या तळासरी केंद्रातून निवृत्त झाले पण आजही ते त्यांचे माहेरघर आहे. अनेक निमित्तांनी त्यांचे या आश्रमात सतत जाणे येणे असते. त्याचबकोबर ते संघसाहित्याचा प्रचार व केशवसृष्टीच्या उत्पादनांची विक्री करतात. सा. विवेकचे वाटप करतात.

**(विश्व हिन्दू परिषदेच्या स्मरणिकेतून साभार)**

**मूर्खांची जेथे पूजा होत नाही, तेथे धान्य चांगले साठविलेले असते आणि जेथे नवराबायको भांडत नाहीत तेथे लक्ष्मी स्वत:च येऊन रहाते.**

## ❖ विशेष उल्लेखनीय घटना (टॉप टेन) ❖

→ २०१४-१५ हे विश्व हिन्दू परिषदेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष होते. त्यानिमित्ताने तळासरी परिसरात वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, भगत सम्मेलन आदी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

→ १ ऑगसट २०१४ रोजी पालघर जिल्हा हा संपूर्ण वनवासी जिल्हा निर्माण झाला. वसई, पालघर, डहाणू, तळासरी, विक्रमगड, वाडा जव्हार आणि मोखाडा असे ८ तालुक्यांचा समावेश यात करण्यात आला आहे.

→ लार्सन ॲण्ड टुब्रो चॅरिटेबल ट्रस्ट आणि वनवासी कल्याण आश्रम यांच्यामार्फत तळासरी तालुक्यामधे सोमवार ते शुक्रवार असा वर्षभर चलचिकित्सालयाचा उपक्रम चालवण्यात आला. सुमारे २५०० रुग्णांची तपासणी वर्षभरात करण्यात आली.

→ शरीराने अपंग परंतु मनाने अत्यंत जिद्दी असलेले, शिक्षण घेत मुख्याध्यापक झालेले, धर्म, संस्कृती, परंपरा याचे उत्तम ज्ञान असलेले श्री. महादेव सावजी अंधरेगुरुजी यांचे २ ऑगस्ट १४ रोजी निधन झाले.

→ दि. ३० ऑक्टोबर २०१४ रोजी कै. माधवराव काणे स्मृतिदिन संपन्न झाला. विश्व हिन्दू परिषदेचे संयुक्त महामंत्री श्री. विनायकराव देशपांडे हे प्रमूख वक्ते होते. यावेळी २ व्यक्तींचा शुद्धिकरणाचा कार्यक्रम झाला.

→ माजी विद्यार्थी संघातर्फे पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण वर्ग दर शनिवार-रविवार असे ५ महिने घेण्यात आले. सुमारे ३५० तरुणतरुणीनी यात सहभाग घेतला. ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्री. लक्ष्मणदादा खरपडे (निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त) यांनी मार्गदर्शन केले. श्री. विवेक करमोडा आणि श्री. अविनाश काकड यांनी आयोजन केले.

→ आदिवासी युवा मंडळ आणि वनवासी विकास प्रकल्प तळासरी तर्फे आयोजित ४३ जोडप्यांचा सामुहिक विवाह समारंभ सायवन येथे १४ मार्च २०१५ रोजी संपन्न झाला. लायन्सक्लब, रोटरी क्लब ह्या डोंबिवलीतील संस्थांनी या कार्यक्रमाच्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी उचलली.

→ श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त श्री. माधव बर्वे यांचे किर्तन झाले. श्री. मिलिंदजी पराण्डे अखिल भारतीय मंत्री विहिंप हे उपस्थित होते.

→ दिनांक ११ एप्रिल २०१५ रोजी वार्षिकोत्सव संपन्न झाला. आंबिलमहोत्सव ही यावेळी साजरा करण्यात आला. मा. खासदार श्री. चिंतामणदादा वनगा, मा. सभापती (समाजकल्याण विभाग जि.प. पालघर) श्री. धर्मादादा गोवारी हे यावेळी उपस्थित होते.

→ वनवासी कल्याण आश्रम आणि तळासरी प्रकल्पाचे डहाणू वसतिगृह यासाठी लाखो रुपयांचा निधी जमा करणारे श्री. शामराव जोशी, ठाणे यांचे २९ सप्टेंबर २०१४ रोजी निधन झाले.

*हार्दिक शुभेच्छा !*

**सुविधा जनरल स्टोअर्स**

**हार्डवेअर आणि जनरल स्टोअर्स**

प्रो. गंगाप्रसाद कन्हैयालाल शाह

उंबरगाव रस्ता, तळासरी-४०१६०६.

**दूरभाष क्र.: ९६६५४०९९६१**

*हार्दिक शुभेच्छा !*

**वंदना फूटवेअर**

*मा. सुभाषचंद्र बिंद*

चारणीया टॉवर, गाळा क्र. १३, तळासरी,
जि. पालघर-४०१६०६.

*'वनसखा'*
*वार्षिक अहवाल २०१४-१५ साठी*
*हार्दिक शुभेच्छा !*

**हितचिंतक**

❖ विशेष लेख

# दुर्गम भागाचा विकास हे धर्मादादा यांचे ध्येय

**तळासरी प्रकल्पाचे ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्री. धर्मादादा गोवारी (सुत्रकार ता. तळासरी) हे जिल्हा परिषद पालघर समाजकल्याण विभागाचे मा. सभापती झाले. त्यांच्या विषयी लिहित आहेत. ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. म.ज.तथा अप्पा जोशी. (सौजन्य -मुंबई तरुणभारत)**

आमचे धर्मादादा पालघर जिल्हा समाज कल्याण खात्याचे सभापती झाले आणि वनवासी कल्याण केंद्र तळासरीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला. या केंद्राने खासदार बघितला, आमदार बघितला व मंत्रीही बघितला पण, धर्मादादांचे या पदापर्यंत पोहोचणे ही वेगळीच गोष्ट आहे. यांचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. कै. माधवराव काणे यांनी केंद्रातील सर्व विद्यार्थ्यांवर जो संस्कार केला. त्यामध्ये कोणतेही काम कमीपाणाचे नाही. ते काम करीत असताना समाज हित डोळ्यासमोर असले की त्या कामाचे महत्व वाढते. केंद्रातील माजी विद्यार्थ्यांना दादा ही दिलेली पदवी अनेकांनी सार्थ करुन दाखविली आहे. १९७४ पासून २०१५ पर्यंत ज्या केंद्राने आपल्याला शिक्षण व संस्कार दिले त्याचे विस्मरण होऊ न देता केंद्र मोठे होण्यासाठी केंद्राच्या उपक्रमांमध्ये धर्मादादांचा सहभाग जबाबदारीचा राहिला आहे. आजही ते सर्व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींचे त्याच बरोबर परिसरातील सर्वांचे आदरणीय धर्मादादा आहेत.

मला एक गोष्टीचं स्मरण ठेवावे लागेल रमाबाई वहिनींचे योगदान धर्मादादांच्या कर्तृत्वात फार महत्वाचे आहे. लेखाच्या विस्तार भयास्तव सर्वांचा उल्लेख टाळतो; पण आमच्या सर्व दादांच्या कर्तृत्वात त्यांच्या सौभाग्यवतींचा व कुटुंबीयांचा सिंहाचा वाटा आहे.

घरचे खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याचे काम या सर्वांनी केले आहे. 'मारा झोडा आणि पळ काढा' अशा घाणेरड्या राजकीय मानसिकतेला तोंड देत धर्मादादांचा सुमारे ३० वर्षाचा प्रवास झाला आहे. अनेकवेळा जीवघेण्या मानसिकतेला तोंड देत त्यांनी केला आहे. त्यामुळे या पदाचा मान त्यांना मिळेल हे आम्हा सर्वांसाठी (त्यांचा सन्मान गौरवाचा वाटतो) अभिमानाचा आहे.

स्व. माधवरावांचा एक आग्रह असायचा, त्यामध्ये शेती व्यवसायालाही प्राधान्य होते. धर्मादादांनी ११वी नंतर पुढील शिक्षणाचा विचार न करता गोपालन व शेती व्यवसायाकडे वळले. त्याला जोड म्हणून सुरवातीला छोटे किराणा दुकान नंतर रेशन दुकान हे सर्व करताना, त्यांनी स्वतः पुढील शिक्षण घेतले नाही, पण त्यांनी आपल्या दोन मुली व चार मुलांना शिक्षित केले.

सूत्रकार येथे सुरु असलेल्या दोन्ही प्राथमिक, माध्यमिक शाळांच्या व्यवस्थापन व वाढीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. गेली २० वर्ष ते ग्रामपंचायतीचे सदस्य असल्यामुळे गावाच्या सर्वांगीण विकासांमध्ये त्यांचा सहभाग आहे. तळासरी केंद्राने गेल्या ४५ वर्षात गावपातळीवर व तालुकापातळीवर अनेक उपक्रम राबविले. त्यामध्ये त्यांच्या कामाचा वाटा सदैव जबाबदारीचा राहिला आहे. खर म्हटलं तर केंद्राने हाक मारली आणि धर्मादादा केंद्रात पोहोचले नाहीत, असे कधी झाले नाही. (अशी प्रथा त्यांनी आजपर्यंत ठेवली आहे.) कारसेवेमध्ये आवर्जून भाग घेतला.

दहिहंडीची यशस्विता त्यामध्ये सहभागी झालेल्या गोविंदावर अवलंबून असते. त्याप्रमाणे धर्मादादांनी आपल्या राजकीय व सामाजिक जीवनात ती जाणीव गेले ३० वर्ष यशस्वीपणे सांभाळली. अगदी सुरुवातीच्या काळात जनसंघासाठी पायी व सायकलीवरून प्रवास केला, अर्थात घरचे खाऊन. त्या वेळी तर लालभाईंची त्या भागावर मोठ पकड होती. त्यानंतर प्रत्येक लोकसभा व विधानसभा यांच्या निवडणुकीत धर्मादादांच्या पायाला भिंगरी असायची.

ॲड. खासदार चिंतामण वनगा, आ. विष्णू सवरा

तसेच आमदार धनारे यांनी आठवणीने त्यांना पालघर परिषेदेचे समाज कल्याण सभापतीचा मान दिला. हा त्यांनी केलेल्या कामाचा गौरव आहे. तसेच केंद्रातील सर्व विद्यार्थी/विद्यार्थिनींना, सर्व व्यवस्थापक व परिसरातील हितचिंतक यांना झालेल्या आनंद अवर्णनीयच आहे.

मी माझे भाग्य समजतो धर्मादादांसारख्या एका समाजव्रती कार्यकर्त्याबरोबर त्यांच्या विद्यार्थी दशेपासून ते सभापती पदाची धुरा अशी सुमारे ४५ वर्ष जीवनाची वाटचाल अनुभवता आली. त्यांच्या या कार्यात ते यशस्वी होवोत, अशी प्रार्थना करून खूप काही लिहावयाचे आहे, पण आवरते घेतो. आज ६१ व्या वर्षात पदार्पण केलेले धर्मादादा तरुणांना लाजवतील, असे काम करीत आहेत.

## ❖ अभिप्राय ❖

→ एक वेळेस येऊन फार अपूरं वाटलं. मुलं फार कष्टाळू आणि अतिशय साधी आहोत.

-श्री. अजित रत्नाकर, डोंबिवली

→ अप्रतिम अनुभव आला. इथल्या मुलांसाठी उत्तम सोयी आहेत. वनवासी समाजाच्या विकासाचे देवकार्य येथे छान पद्धतीने राबवले जात आहे.

- श्रीम. मुग्धा चं. दाते, कल्याण

→ परिसर खूप आल्हाददायक आहे. लोकांची मेहनत बघून कौतूक वाटले. साधी राहणी उच्च विचारसरणी!

-दर्शना स. मुळे, ठाणे

→ खूप छान अनुभव आला. माहिती नसलेल्या बऱ्याच गोष्टी समजल्या.

-जुईली आ. म्हात्रे, परळ

→ फारच छान अनुभव होता. इथल्या भाषेचा संस्कृतीचा अजूनही पुढे अभ्यास करावा असे नक्कीच वाटत आहे. परिसर व वातावरण आल्हाददायक आहे.

-नताली रा. कुकतुके, गोरेगाव

## ❖ चिंतन ❖

विश्व हिन्दू परिषदेने आपल्या सूवर्णमहोत्सवी वर्षात दोन महत्वाच्या मुद्यांवर विशेष लक्ष सर्व देशभर देण्याचे ठरवले. एक म्हणजे वृक्षारोपण आणि दूसरे नेत्रदान! वृक्षारोपणासंबंधी काही प्रमाणात जागृती झालेली आहे. केली जात आहे. परंतु नेत्रदानाविषयी म्हणावे तसे जागरण आपल्याकडे झालेले दिसत नाही.

### नेत्रदान - श्रेष्ठदान

१) जगातील एकूण नेत्रहीन व्यक्तींपैकी २०% म्हणजे सव्वाकोटी नेत्रहीन भारतात आहेत.

२) त्यापैकी ३० लाख लोकांना नेत्रदानाने दृष्टी मिळू शकते.

३) नेत्रदान हे मरणोत्तरच करता येते.

४) दरवर्षी भारतात सुमारे ८० लाख मृत्यू होतात परंतु ह्यातील फक्त १५००० व्यक्तींचेच नेत्रदान होते.

५) भारतात जी नेत्ररोपणे होतात त्यासाठी दान केलेले नेत्र हे श्रीलंकेसारख्या छोट्या देशातून आलेले असतात.

६) नेत्रदान कोणीही व्यक्ती मृत्यूनंतर करु शकतो.

७) वय, धर्म, जात, आजार काहीही आड येत नाही.

८) मृत्यूनंतर लवकरात लवकर ३ ते ४ तासात नेत्रदान होणे आवश्यक आहे.

९) मृत्यूनतर आपण जसे नातेवाईकाना कळवतो तसे नेत्रपेढीला कळवायचे.

१०) नेत्रपेढीला कळवताना खालील गोष्टी करुन ठेवाव्यात

१) डॉक्टरांकडून मृत्यू प्रमाणपत्र तसेच १० सी. सी. रक्ताचा नमुना घेऊन ठेवणे.

२) मृताचे डोळे व्यवस्थित बंद करुन पापण्यांवर बर्फ अथवा ओल्या कपड्याच्या घड्या ठेवाव्यात.

# ओळख वनवासी जीवनाची

## ❖ आहार ❖

मानव प्राण्यांच्या वाढीसाठी पोषक जीवनमूल्यांची गरज असते, ती पूर्ण करण्यासाठी मानव विविध धान्य, कडधान्य, दूध, मासे, मांस यांचा आहारात उपयोग करतात.

भात हे त्यांचे मुख्य अन्न आहे. परंतु वर्षांचे बारा महिने पुरेल इतका भात सगळ्यांकडे पिकत नाही. त्यामुळे भाताच्या जोडीने ते नाचणी, वरी, ज्वारी, बाजरी पिके घेतात. या धान्याची भाकरी करुन खातात. नाचणी, ज्वारी, वरी या धान्यांचे पीठ मडक्यात पाणी टाकून आंबत ठेवतात. रोज कालवून ठेवलेल्या पिठाचे आंबोण काही शिल्लक ठेवून चुलीवर गरम पाण्यात ओतून उकळवून आंबील बनवतात. पुढच्या दिवसाच्या पिठाचे विरजण किंवा आंबील बनण्यासाठी असते. **आंबील शरीराला अतिशय पोषक असते.**

कडधान्य, तूर, उडीद, चवळी, वालपापडी, चणे इ. ची आमटी शिजवून भाजी, डाळ, वरण करतात. वालपापडीच्या शेंगा, शेवग्याचा पाला, चिंचेचा कोवळा पाला, कोहरेलाचा पाला, भांजभाजी, विविध झाडांची भाजी इ. भाज्या खातात. नदीच्या पात्रातील सोल नावाची पालेभाजी, धोदडी, शेवाळी, कोळी भाजी इ. भाज्या खातात.

पावसाळ्यात येणाऱ्या टेटवी झाडाच्या शेंगा ह्या कारल्यापेक्षाही कडू असतात. पण औषधी म्हणून त्यांची भाजी खातातच. कोवळ्या बांबूचे लोणचे, अळंबी यांची भाजी त्यांच्या आहारात असते.

वर्षाचे बारामाही महिने सुकलेली मासळी भाजून किंवा कालवण करुन खातात. तसेच ताजे मासेही भरपूर प्रमाणात उपयोगात आणतात.

**दिवाळी** : काकडी, तांदळाचे पीठ मिसळून पानग्या (सावेल्या भाकऱ्या) बनवतात. काहीजण तांदळाच्या पिठाचे लाडू बनवतात. कुलदेवतेला अर्पण केलेला कोंबड्याचा प्रसाद, नवीन हंगामातील शिजवलेल्या चवळी देवाला अर्पण करुन नंतर खातात. शिकार करुन आणलेले मांस खातात. सणानिमित्त वर्गणी काढून बोकडाचे मांस खातात. सगळीच माणसे मांसाहारी असतात असे नाही. प्रत्येकाच्या ऐपतीप्रमाणे बेत असतो. त्याप्रमाणे दिवाळीचे भोजन ठरलेले असते.

**होळी** : तांदळाच्या पिठाचे लाडू, नाचणीच्या पिठाचे लाडू देवाला अर्पण केलेला कोंबडा, असा प्रत्येकाचा परिस्थितीनुसार आपला बेत आखलेला असतो. नवीन हंगामातील देवाला अर्पण करण्यासाठी आंबे असतात ते अर्पण करुन खातात.

**कोळी भाजी खाणे** : प्रत्येक वर्षी पहिला पाऊस पडून गेला की कोळी भाजी रानावनात रुजून येते. पेरणी वगैरे झाल्यावर एक दिवस कोळी भाजी खाण्याचे ठरवतात. परंपरेनुसार प्रथम हंगामातील भाजी म्हणून ती भाजी करुन देवाला प्रसाद किंवा नैवेद्य म्हणून अर्पण करतात, नंतर कुटुंबातील सर्व माणसे एकत्र बसून भोजनाबरोबर ती खातात.

**नवे भात खाणे** : प्रथेप्रमाणे हंगामातील पिकविलेले धान्य म्हणजे भात. भाताचे पोहे तयार करुन, नवीन भाताचा भात करुन तो देवाला प्रसाद म्हणून देतात. या दिवशी कुटुंबातील सर्व माणसे नवे खाण्यासाठी म्हणून एकत्र येतात. प्रथम पोहे देवाला अर्पण करुन मुलांना, मोठ्यांना हातावर देतात. एकमेकांच्या तोंडात भरवण्याची देखील प्रथा आहे. त्याप्रमाणे नवे भात खातात. कुटुंबातील माणसे या निमित्ताने तरी एकत्र यावीत हा यामागील हेतू असतो.

उन्हाळ्यात सगळ्यांकडे समाधानकारक परिस्थिती असतेच असे नाही. तेव्हा ते शेवग्याचा पाला, चिंचेचा कोवळा पाला, फुले, अंबाडी, सोल, भांज, कोहरेलाचा पाला विविध झाडांची फुले, फळे, कंदमुळे, कडूकंद, विविध नैसर्गिक वनस्पती, फळे खाऊन उन्हाळ्याचे दिवस काढतात.

भात भाकरीबरोबर खूरसाना, शेंगदाणे, तीळ, मिरची, आजोळा, कडू बाफली इ. एकत्र करुन चटणी बनवतात. भात भाकरी बरोबर ती खातात.

घरी गायी-म्हैशी, शेळ्या-मेंढ्या असतात.

त्यामुळे प्रत्येकाकडे नाही परंतु काही थोड्या लोकांकडे दूध असते. त्यांचा उपयोग आहारात करतात. या लोकांचे वैशिष्ट्य म्हणजे हंगामातील पालेभाज्या, फळभाज्या, धान्य कडधान्य, ऊस, मुळे इ. वस्तूंची 'पाळ' करतात. काही लोक नवे भात खातात. त्या दिवशी काही भाज्या खातात. काही लोक दिवाळीच्या दिवसापासून धान्य, विविध भाज्या देवाला नैवेद्य अर्पण करुन खातात. तर हंगामातील सर्व पालेभाज्या, फळभाज्या, कडधान्य ऊस, मुळे.... इत्यादी खळ्याचा देव केला जातो. त्या दिवशी नैवेद्य म्हणून अर्पण करुन खाण्यास सुरुवात होते.

कुटुंबाचा आहार त्यांच्या आर्थिक मिळकतीनुसार असतो. समाजातील नोकरदार वर्गाची परिस्थिती देखील त्यांना मिळणाऱ्या वेतनावर अवलंबून असते. एकूणच आहारात बऱ्याच प्रमाणात बदल झालेले आहेत. परंतु बऱ्याच कुटुंबातील उपासमारी अजून दूर झालेली नाही.

**सौजन्य : वारली लोककथा**
**लेखक : श्री. बाळू नम**

## ❖ तळासरी प्रकल्प सूवर्ण महोत्सवी वर्ष २०१७-१८ ❖

→ या अंकापासून तळासरी प्रकल्पाचे सूवर्ण मसोत्सवी वर्ष कशा पद्धतीने साजरे करता येईल याची चर्चा केली जाणार आहे. आपण आपल्या सूचना, आठवणी पाठविल्यास त्यास यथायोग्य प्रसिद्धी देण्यात येईल.

→ दिनांक २० जून २०१५ रोजी कल्याण येथे तळासरी प्रकल्पाच्या सूवर्णमहोत्सवी वर्षासंदर्भात विचारविनिमय करण्यासाठी पहिली बैठक संपन्न झाली. सुमारे ५० कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते. ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. अप्पा जोशी यांनी प्रकल्पाचा इतिहास सर्वांसमोर उभा केला. प्रकल्पाचे व्यवस्थापक श्री. विवेक वैद्य यांनी प्रकल्पाची विद्यमान स्थिती सांगितली. कार्यवाह श्री. किशोर वझे यांनी भविष्यातील योजना सांगितल्या. श्री. माधव बर्वे यांनी सूत्रसंचालन केले. उपस्थितांनी आपली मनोगते व्यक्त केली. मा.श्री. विनायकराव देशपांडे यांनी समारोप केला.

*हार्दिक शुभेच्छा !*

**हरीओम रामचंद्र शहा**

**भाजी विक्रेता**

✵ ✵ ✵

तळासरी नाका,
तळासरी - ४०१६०६, जि. पालघर.

*हार्दिक शुभेच्छा !*

**अमिरभाई केशवाणी**

**किराणा मालाचे व्यापारी**

✵ ✵ ✵

तळासरी नाका, तळासरी-४०१६०६, जि. ठाणे.
दूरध्वनी : ९४२२४९२६४१

*वनवासी विकास प्रकल्पाच्या*
*'वनसखा'*
*या वार्षिक अहवाल २०१४-१५ साठी*
*हार्दिक शुभेच्छा !*

**हितचिंतक**

✵ ✵ ✵

**तळासरी, जि. पालघर**

**क्षणोक्षणी जे नवीन वाटते तेच रम्यतेचे रुप, खऱ्या सौंदर्याची हीच कसोटी.**

# विना इंधन पाणी उपसा यंत्र

❖ कथा प्रकाशकिरणांची ❖

**कथा प्रकाशकिरणांची :** आपल्या समाजासाठी धडपडणारे अनेक कार्यकर्ते-कार्यकर्त्यां आपल्या आजूबाजूला असतात. वनवासी समाजातूनच पुढे आलेल्या ध्येयवादी कार्यकर्त्यांचा परिचय करुन देणारे हे सदर.



**श्री. कमलाकर सुखाड उराडे**
मु.पो.गिरगाव, भुजडपाडा, ता. तलासरी,
जि. पालघर, मो.नं.: ९६२४७६०८३७

**संशोधना मागची पार्श्वभूमी :**

लहानपणापासूनच सामाजिक बाबतीत काम करण्याची आवड असल्या कारणाने पदवीचे शिक्षण पूर्ण करण्या करता फक्त स्वतःसाठी एखादी नोकरी करुन स्वतःचा, आपल्या कुटुंबाचा उदर निर्वाह करणे हा विचार बदलून त्या जागी सर्वसमावेशक प्रगतीच्या ध्यासाने जीवन क्रम सुरु केला. तत्कालीन परिस्थितीत ह्या निर्णयाला आप्तस्वकियांकडून भरपूर विरोध झाला. कारण समाजात शिक्षण म्हणजे फक्त नोकरी करुन प्रगती करणे एवढाच अर्थ होता.

परंतु शाळेत असताना समाजाच्या प्रत्येक क्षेत्रातून मिळालेल्या सहकार्याने माझ्या मनात सामाजिक बांधिलकीची भावना वाढीस लागली आणि मी सर्वसमावेशक विकासाची स्वप्ने पाहू लागलो.

याचाच परीणाम म्हणून मी स्थानिक लोकांना एकत्रित करुन बचत गट स्थापन केले. परंतु सुमारे चार ते पाच वर्षापर्यंत बचत गटांच्या माध्यमातून काही साध्य करु शकलो नाही. या कारणास्तव महिला बचत गट स्थापन करुन त्यांच्या मार्फत कर्ज घेतले व गावातील शेती साठी सिंचनाच्या व्यवस्थेसाठी पाईप लाईन केली. वीज मीटर घेतला, परंतु ग्रामिण भागातील सतत खंडीत होणारा वीज पूरवठा, कमी दाबाचा वीज पूरवठा या मूळे वीज पंप चाललाच नाही. परीणामी कर्जाचे हप्ते थकले. आणि यातच वरील कल्पनेला चालना मिळाली.

विजेवर चालणाऱ्या यंत्राच्या माध्यमाच्या जोरावर प्रगती करणे, त्या वेळी माझ्या दृष्टीक्षेपाच्या आवाक्याबाहेर होते. त्यामुळे मनाशी खूणगाठ बांधली की आपण एखादे असे यंत्र साकार करावे की जे चालवण्याकरीता वीजेची आवश्यकता भासणार नाही. ही कल्पना मी माझ्या मित्रांना सांगितली आणि त्यांनी लागलीच ती कल्पना साकार करण्यास प्रोत्साहन दिले.

सुरवातीला ही कल्पना साकार करताना कमी खर्चाची, कमी वेळेची वाटली, परंतु मुळातच माझी वृत्ती सामाजिक कामात रस घेण्याच्या कारणास्तव एखाद्या सामाजिक कामात उदा. शासकीय कागदपत्रे मिळवणे, गावातील सांस्कृतीक कार्यात सहभाग, रुग्णांना दवाखान्यात हलवणे इ. कामामुळे वरील संशोधनास पाहीजे तेवढा मी वेळ देवू शकलो नाही. त्यातच माझे उत्पन्न शून्य, त्यामुळे मी गावात एक विनोदाचा विषय बनलो. सुशिक्षीत वेडा म्हणून गावात गणना होऊ लागली.

परंतु काही तरी नविन करण्याच्या नादात ह्या टीकेवर कधी लक्ष गेलेच नाही. आणि शेवटी सात वर्षाच्या



कल्पनेवर केलेल्या मेहनतीवर आणि सात वर्षानंतरचे आठ महीने सतत प्रत्यक्ष जागेवर प्रात्यक्षिकाच्या जोरावर माझे विना इंधन पाणी उपसा यंत्र साकार झाले व ते शेवटी ३१ डिसेंबर २०१४ रोजी मी माझ्या वरोळी नदीवरील गावात नदीच्या पात्रात बसवले व ते सतत चालू असते ते प्रत्येक चोविसतास पाच ते सहा हजार लिटर पाणी उपसा करते, ते पाणी मी पाईप द्वारे माझ्या शेतात नेलेले असून नदीपासून माझ्या शेताची लांबी जवळ जवळ ३०० मीटर असून उंची ४२ फूट आहे.

या मिळणाऱ्या पाण्यापासून मी माझ्या शेतात आज नगदी पिके विना खर्चाने घेवू शकतो.

एकेकाळी विनोदाचा भाग म्हणून चर्चा करणारे लोक आता मात्र कुतूहलाने त्याची चर्चा करताना दिसतात.

**यंत्राची काम करण्याची पद्धती :**

छायाचित्रात दाखवल्या प्रमाणे एक सहापाती चक्र वाहत्या पाण्यात असे बसवले आहे कि त्याचे एकपाते पाण्यात बुडत असताना दुसरे पाते पाण्याच्या प्रवाहातून वर येते, त्यामुळे हे चक्र सतत फिरत राहते.

वरील फिरणाऱ्या चक्रावर एक लाकडी दांडा बसवून तो सतत पात्यावर पडून वर खाली होत राहतो हाच दांडा पाणी उपसा करणाऱ्या पंपाला दोरीच्या सहाय्याने जोडलेला आहे. पाणी उपसा करणारे पंपाच्या वरच्या भागाला एक दुसरा वॉल बसवून उपसा होणाऱ्या पाण्याला दाब दिलेला आहे.

त्यामूळे खालच्या पंपातून उपसा होणारे पाणी वरच्या पंपाद्वारे दाबले जाते, त्यामूळे मधल्या जागी बसवलेल्या नॉन रिटर्न वॉलद्वारे ते पाणी बाहेर पडून ते ठरावीक उंचीवर बसवलेल्या पाईपमध्ये (४२ फुट उंचीवर) सोडले जाते व ते पुढे पाईप लाईन द्वारे शेतीतील पाण्याच्या टाकीत जमा होर्ते. पूढे त्याचा वापर शेतीसाठी केला जातो.

कोणी कोणाला आपोआपच चांगला, आदरणीय किंवा दुष्ट म्हणत नाही. या जगात माणसाला मोठेपणा किंवा हलकेपणा त्यांच्या स्वतःच्या करणीमुळेच मिळतो.

# मनोगत

-दर्शना गणपत शिंदा,
उधवा इयत्त ११वी

मी सन २०१२ ला इयत्ता ८वी मध्ये प्रवेश घेतला. या वसतिगृहात प्रवेश मला माझ्या मोठ्या बाबांचा मुलगा सुरेश शिंदा याने करुन दिला. त्याची मी खूप-खूप आभारी आहे. कारण विश्व हिंदू परिषदेसारखी दुसरी कोणतीच संस्था नसेल. या वसतिगृहात मला प्रवेश मिळाला याचा मला खूप अभिमान वाटतो. कारण की मी व माझ्या इयत्ता सातवी पर्यंत असलेली सर्व मित्रमंडळी यांच्या मधील खूप सारा फरक मला स्वतःला जाणवत असतो. त्यांचे वागणे, बोलणे, चालणे, त्यांच्या आवडीनिवडी यांच्यात मला खूप फरक वाटतो. मी त्याच्यात गेल्यावर मला त्याच्यातून वेगळेपण सतत जाणवत असते.

मला हे वसतिगृह एखादी सोन्याची खाण असते तसे संस्काराची खाण वाटते. माझ्या नशिबाने मला दिलेली ही खूप मोठी देण आहे असे मला वाटते. ही ईश्वराची माझ्यावर असलेली एक कृपाच आहे. या वसतिगृहात घेतल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमांमुळे माझ्याकडे नकळत अनेक वेगवेळ्या आवडीनिवडी, छंद उत्पन्न झाले. त्यामुळे माझ्यामध्ये खूप वेगवेगळे गूण आले. आणि त्याच्यामुळेच गावात मला एक वेगळे स्थान मिळाले. मोठी माणसं सुद्धा माझ्याशी आदराने वागत असतात. मी जेव्हा वसतिगृहात असते तेव्हा आमच्या गावातील अंगणवाडीच्या बाई मला विचारायला आमच्या घरी यायच्या. तुमची छोटी मुलगी आली की नाही. त्यामुळे आमच्या घरच्यांना माझे आश्चर्य वाटते. मी इथे काही शिकले व ते घरी जाऊन करते ते सगळ्यांना आवडते. मी घरी आले असे कळताच माझे मित्र-मैत्रीणी मला घरी भेटायला येतात. त्यामुळे मला खूप आनंद होतो.

हे सगळे मला या वसतिगृहाने दिले आहे. इथली माणसं कशी? इथली वागणूक कशी? इथले राहणीमान कसे? इथले संस्कार कसे याचा विचार केला पाहिजे. इथल्या विद्यार्थ्यांला या जगात काय चालले या सर्व गोष्टींचा परिचय व्हावा. त्यांची ओळख व्हावी. तो या जगात एकटा कुठेपण वाटू शकेल असे त्याच्यावर संस्कार केले जातात. त्याला घडवले जाते. या वसतिगृहातून शिकून गेलेला विद्यार्थी हा सर्वात वेगळा असतो.

हे वसतिगृह म्हणजे नुसतं वसतिगृह नव्हे तर ते एक आपलं मोठ दूसरं घरच आहे. आपण इथे कित्येक गोष्टी शिकत असतो. या वसतिगृहात अनेक सूसंकारीत रोपे तयार केली जातात. व पुढे ते मोठ-मोठ्या पदावर जाऊन फुलत असतात. असा हा इथला विद्यार्थी असतो. या तीन वर्षामध्ये मी एवढं काही शिकले की, ते मी शब्दांत मांडू शकत नाही. या वसतिगृहाचे माझ्यावर खूप खूप उपकार आहेत आणि यांचे ऋण मी कधीच फेडू शकत नाही.


*हार्दिक शुभेच्छा !*



**लक्ष्मण वरखंडे**

| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | : भारतीय जनता पार्टी, तळासरी |
| **अध्यक्ष** | : श्री गणेशकृपा आदिवासी कला क्रिडा मंडळ, वसा |
| **उपाध्यक्ष** | : वरखंडे कुळ परिवार संस्था |
| **सदस्य** | : लोकमान्य टिळक वाचनालय, तळासरी, |
| **व्यवसाय** | : मुद्रांक विक्रेता, तळासरी |


## ❖ हे पान मुला मुलींचे ❖

**बोधकथा**

एक १८ वर्षाचा मुलगा रेल्वेमधे खिडकीजवळच्या आसनावर बसला होता. अचानक तो आनंदाने जोरात म्हणाला "बाबा, ती पहा, झाडे मागे मागे पळत जात आहेत. त्यांच्या वडीलानी प्रेमाने त्याच्या डोक्यावरुन हात फिरवला तो मुलगा पून्हा मोठ्याने म्हणू लागला बाबा, बाबा, ते पहा आकाशातील ढग आपल्या रेल्वे बरोबरच पुढे पुढे जात आहेत. वडीलांच्या डोळ्यातून अश्रू बाहेर आले.

शेजारी बसलेला प्रवासी हे सारे पाहत होता. तो म्हणाला, आपला मूलगा एवढा मोठा होऊनही लहान मूलासारखे वागतो आहे? एखाद्या डॉक्टरला का दाखवत नाही? तेव्हा त्या मूलाचे वडील म्हणाले की आम्ही डॉक्टरकडूनच येत आहोत. माझा मूलगा जन्मापासून आंधळा होता. अलीकडेच त्याला दृष्टी लाभली आहे.

**नेत्रदान करा आणि दूसऱ्याच्या जीवनात आनंद निर्माण करा.**



← **राजु सखाराम मेघवाले इ. ९वी**

## ❖ प्रेरणा गीत ❖

निर्मल पावन भावना, सभी के सूख की कामना
गौरवमय समरस जनजीवन, यही राष्ट्र आराधना
चले निरन्तर साधना... ।।धृ।।
जहाँ अशिक्षा अंधकार है, वहाँ ज्ञान का दीप जलायें
स्नेहभरी अनुपम शैली से, संस्कार की ज्योत जगाए
सभी को लेकर साथ चलेंगे, दूर्बल का कर थामना।
चले निरन्तर साधना... ।।१।।
जहाँ व्याधिओं और अभावों, में मानवता तडप रही ।
घोर विकारों अभिशापोंसे, देखो जगती झुलस रही।
एक एक आंसू को पोंछे, सारी पीडा लांघना।
चले निरन्तर साधना... ।।२।।
जहाँ विषमता भेद अभी है, नयी चेतना भरनी है।
न्यायपूर्ण मर्यादा धारे, विकासरचना करनी है।
स्वाभिमान से सभी खडे हो, करे न कोई याचना।
चले निरन्तर साधना... ।।३।।
नर सेवा नारायण सेवा, है अपना कर्तव्य महान।
अपनी भक्ति अपनी शक्ती से करना जन जन का काम
अपने तप से प्रकटायेंगे, माँ भारत कमलासना।
चले निरन्तर साधना... ।।४।।



**अजय लक्ष्मण ठाकरे**

## ❖ देणगीदार यादी (मार्च २०१५ ते जून २०१५) ❖

✦ **रु. ७५,०००.०० अनुदान**
→ डोंबिवली नागरी सह. बँक, डोंबिवली

✦ **रु. ५१,०००.००**
→ सौ. शुभदा विनायक रहाळकर, पालघर प.

✦ **रु. २५,०००.०० (प्रत्येकी)**
→ श्री. ओमप्रकाश कपूर, कांदिवली
→ श्रीम. वृंदा डी. काळे, मुंबई
→ श्रीम. अल्पना अरविंद डबीर, दहिसर प.

✦ **रु. २०,०००.००**
→ कार्पोरेशन, डोंबिवली पूर्व

✦ **रु. १७,०००.००**
→ श्रीम. मंदाकिनी अनिल बेहेरे, डोंबिवली

✦ **रु. १२,५००.०० (प्रत्येकी)**
→ श्री. राजेंन्द कानडे, नवीमुंबई
→ श्री. नरेंन्द्र नाडकर्णी, मुंबई

✦ **रु. १२,०००.०० (प्रत्येकी)**
→ श्री. सुजित बांदेकर, अंधूरी पू.
→ श्री.पी.एन. अमरसी फाऊंडेशन, मुंबई

✦ **रु. १०,०००.००**
→ ज्ञान प्रसारिणी कळवे, ठाणे
→ निर्मला आर. शानी, मुंबई
→ कु. अनुराधा गोपाळकृष्ण नायक, डोंबिवली
→ श्री. अरविंद मोहनलाल शाह, पुणे

✦ **रु. ८,०००.००**
→ श्री. पांडूरंग गणपत बोराडे, ठाणे पू.

✦ **रु. ७,०००.००**
→ श्री. अनिरुद्ध एस्. दामले, डोंबिवली पू.

✦ **रु. ६,०००.०० (प्रत्येकी)**
→ श्री. राजेंद्र बाळाजी पवार, मिरा रोड
→ डॉ. बृहद आनंद अभ्यंकर, डोंबिवली पू.
→ श्री. संजय मुल्कीकर, ठाणे प.
→ श्रीरंग मर्कन्टाईल इंडिया प्रा.लि., मुंबई

✦ **रु. ५,१००.००**
→ गेकुलेश्वर प्रभात शाखा, विरार,वसई

✦ **रु. ५,०१०.००**
→ श्री. दिलीप विनायक जोशी, डोंबिवल पू.

✦ **रु. ५,००५.००**
→ श्री. सुधीर गोपाळ रायकर, डोंबिवली पू.

✦ **रु. ५,००१.०० (प्रत्येकी)**
→ श्रीम. उल्का अरुण पाटणकर, बोरीवली प.
→ श्री. दिलीप गो. जोशी, कांदिवली, पू.

✦ **रु. ५,०००.०० (प्रत्येकी)**
→ श्री. श्रीकांत राजाराम कुलकर्णी, मुलुंड प.
→ सौ. गायत्री मोरेश्वर ओगले, पुणे
→ श्री. अरविंद नरहर भिडे, मुलूंड पू.
→ श्री. मधूकर भास्कर साठे, डोंबिवली पू.
→ सौ. मंगलाताई रानडे, डोंबिवली पू.
→ श्री. अनिरुद्ध एस. दामले, डोंबिवली पू.
→ श्री. अशोक दत्तात्रय देशपांडे, डोंबिवली पू.
→ श्रीम. बीना एम. शानी मुंबई
→ श्री. संदीप घरत, डोंबिवली पू.
→ व्ही.एम.गोखले, ठाणे प.
→ श्री. आनंद दाते, मुंबई
→ भारत विकास परिषद, अंधेरी
→ सौ. शैला आर. गौलानी, गोरेगांव
→ श्री. अशोक एच. तुळपुळे, पुणे
→ श्री. सुरजभाई पन्नालालजी मेहता मेमोरियल ट्रस्ट, मुंबई
→ श्री. चंदूलाल म. चोक्सी ट्रस्ट, मुंबई
→ जाधवभाई तापडीया ट्रस्ट, पुणे
→ श्री. शरदराव डी. कुळकर्णी, ठाणे

✦ **रु. ४,०००.०० (प्रत्येकी)**
→ श्री. पुरुषोत्तम कृष्णाजी कुलकर्णी, पूणे
→ एम.एन. शेंबेकर, डोंबिवली पू.
→ श्री. अजित रघुवीर नेर्लेकर, डोंबिवली पू.
→ श्री. संजय नारायण मुल्कीकर, ठाणे
→ श्री. किशोर वझे, गिरगाव
→ श्री. प्रकाश के. फणसेकर
→ श्री. के.अे.महाडीकर, अंधेरी पू.
→ श्रीम. नेहा एम. मळेकर, वसई

✦ **रु. ३,०००.०० (प्रत्येकी)**
→ श्री सेवा भक्तिगीत मंडळ, डोंबिवली पू.
→ श्रीम. दिप्ती रजनिकांत मालवणकर, डोंबिवली पू.
→ श्रीम. विद्या प्रभु. ठाणे
→ श्रीम. शामली पी. फणसेकर
→ डॉ. प्रसाद पी. फणसेकर

✦ **रु. २,५००.०० (प्रत्येकी)**
→ श्री. सुनिल वारे, कांदीवली पू.
→ डॉ. एस.डी.भालेराव, पुणे

✦ **रु. २,२२२.००**
→ श्रीम. जयश्री भरत केणी, भाईंदर

✦ **रु. २,२००.०० (प्रत्येकी)**
→ श्री. के. एन. राठी, मुंबई

✦ **रु. २,००१.००**
→ भारतीय मजदुर संघ, कल्याण

✦ **रु. २,०००.०० (प्रत्येकी)**
→ सौ. स्मिता दातार, बोरीवली, पू.
→ सौ. नंदा एन्. वायंगणकर, पुणे
→ श्री. अच्युत मुरलीधर जोशी, डोंबिवली पू.
→ बिवलकर आणि आप्तेष्ट, गोरेगांव पू.
→ अल्फा आर्ट अकॅडमी, मुलूंड पू.

✦ **रु. १,५०१.००**
→ श्री. रमेशराव जोशी, गिरगाव

✦ **रु. १,१०१.००**
→ श्रीम. भारती वाजपेयी, बोईसर प.

✦ **रु. १,१००.०० (प्रत्येकी)**
→ श्री. महेंद्र संघवी, मुंबई
→ श्री. भरत काराणी, मुंबई

✦ **रु. १,००२.०० (प्रत्येकी)**
→ श्री. सुब्राय अे. गायतोंडे, बोरीवली.

✦ **रु. १,००१.००**
→ श्री. विलास पिंपळ खरे, डोंबिवली पू.

✦ **रु. १,०००.०० (प्रत्येकी)**
→ श्री. सुरेशचंद्र पांडे, मिरा रोड
→ श्री. हेमंत कोंठारी, बडोदरा

**दुसऱ्यांना उपदेश करण्याचे पाण्डित्य पुष्कळ लोक दाखवतात. परन्तु हे शहाणपण स्वतःच्या कार्याच्या वेळी साधारणपडे विसरतात.**

→ श्री. प्रभाकर विठोबा सावंत, बोईसर
→ सौ. स्वाती एन्. जयवंत, दादर प.
→ श्री. संजय देशमुख, रत्नागिरी
→ श्री. निलेश नारायण वैशंपायन, रत्नागिरी
→ श्री. माधव पुरुषोत्तम बेहेरे, पुणे
→ श्री. कुंदन भट्ट, बोरीवली प.
→ प्रताप प्रभात शाखा, नाशिक
→ श्री. प्रकाश शंकर जोग, रत्नागिरी
→ श्री. रमेश गजानन जोशी पुणे
→ श्री. किशोर व्यवहारे, डोंबिवली पू.
→ श्री. गंगाधर चिंतामण जोशी, डोंबिवली पू.
→ सौ. अनुष्का राहूल सरपोतदार, डोंबिवली पू.
→ सौ. माधवी मोरेश्वर कुलकर्णी, डोंबिवली, पू.
→ श्रीम. सुरेखा सुरेश पाटणकर, पुणे
→ श्रीम. अलका सुरेश फाटक, डोंबिवली पू.
→ बागरी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई
→ श्री. अजय मधुसदन भडकमकर, पालघर
→ श्री. हेमंत केशव आंग्रे, भाईंदर
→ श्री. प्रकाश सी. फणसेकर, मुंबई
→ श्री. संदीप जे. महांबरे, वसई
→ श्री. प्रदीप जे. देशपांडे, वसई
→ श्रीम. वंदना एम. देशपांडे, वसई

**✦ रु. १०००.०० (प्रत्येकी)**

→ श्री. अे. जी. वझे, पुणे
→ मे. उत्तम पब्लीक चॅरि. ट्रस्ट, काळ बादेवी (दरमहा)
→ श्री. जयदीप एम. वाकणकर, पुणे
→ श्री. कस्तुर के. शाह, घाटकोपर पू.
→ श्री. तेजस व्ही. तन्ना, मुंबई २१
→ श्री. रविंद्र के. देवधर, पुणे
→ श्री. गोपाळ गणेश आणि सत्यभामाबाई दांडेकर ट्रस्ट, पुणे
→ श्री. सोरब एम. इंजिनियर, मुंबई-३८

**✦ रु. ८५०.००**

→ श्री. शरदचंद्र पुरुषोत्तम इखे, डोंबिवली पू.

**✦ रु. ५५०.००**

→ श्री. अच्युत मधुसदन कऱ्हाडकर, डोंबिवली पू.

**✦ रु. ५,०१.०० (प्रत्येकी)**

→ श्री. रामअवतार अग्रवाल, भाईंदर प.
→ श्री. मधुकर बाळकृष्ण पिंपूटकर
→ सौ. मनिषा मधुकर पटवर्धन, डोंबिवली पू.
→ श्री. सुनिल जोशी, डोंबिवली पू.
→ श्री. विजय वाजपेयी, बोईसर प.
→ शुभांगी निरंजन मुधाळकर बोरीवली प.
→ श्री. बळवंत अत्रे, ठाणे पू.

**✦ रु. ५००.०० (प्रत्येकी)**

→ सौ. विणा आपटे, पालघर
→ सौ. मनिषा सरदेसाई, रत्नागिरी
→ सौ. अरुणा केळकर, रत्नागिरी
→ श्री. किशोर अरुणराव परसोडकर, वर्धा
→ श्री. जयंत मोरेश्वर भागवत, डोंबिवली पू.
→ श्री. व्ही.पी.हर्डीकर डोंबिवली पू.
→ श्री. वसंत दिनकर जहागिरदार, पुणे
→ सौ. रुतुजा राजेश केळकर, डोंबिवली प.
→ श्री. सुनिल शरद फाटक, डोंबिवली पू.
→ सौ. भारती गंगाधर जोशी, डोंबिवली पू.
→ श्री. सुभाष मोरेश्वर जोशी, डोंबिवली पू.
→ श्रीम. मुग्धा सुनिल जोशी, डोंबिवली पू.
→ श्री. दिपक रघुनाथ घारे, डोंबिवली पू.

**✦ रु. ४००.००**

→ श्री. अशोक दत्तात्रय देशपांडे, डोंबिवली पू.

**✦ रु. ३०१.००**

→ श्री. सतिश कमलाकर दिक्षित, डोंबिवली पू.

**✦ रु. २५१.००**

→ श्री. चंद्रशेखर नारायण कुलकर्णी, डोंबिवली पू.
→ श्री. विष्णू पानवाला, वसई

**✦ रु. २५०.०० (प्रत्येकी)**

→ श्री. भगवानदास ठक्कर, घाटकोपर
→ श्री. राधाकृष्ण नाकोड, मुंबई

**✦ रु. १०१.०० (प्रत्येकी)**

→ श्री. पंकज श्रीराम ओक, मालाड प.
→ श्री. दिनेश देवू कोयंडे, बोरीरली प.

**✦ रु. १००.०० (प्रत्येकी)**

→ श्री. गंगाधर रामचंद्र वाघ, नाशिक
→ श्री. श्रीधर शांताराम लोणकर, नाशिक
→ श्री. भाऊ पवार, नाशिक
→ श्री. जनार्दन रामचंद्र जतकर, डोंबिवली पू.
→ श्रीम. इंकूबाई जोशी, मुलुंड पू.

**सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद !**

## दृष्टीक्षेपातील वनवासी विकास प्रकल्प

**✦ मुंबई कार्यालय : कार्य ✦**

निधीसंकलन, देणगीदार भेटी आणि एकत्रीकरण

**✦ तळासरी प्रकल्प ✦**

- वनवासी विद्यार्थी वसतिगृह
- वनवासी विद्यार्थिनी वसतिगृह
- माध्यमिक विद्यालय
  - → संगणक प्रशिक्षण
  - → सुसज्ज प्रयोगशाळा
  - → व्यवसाय प्रशिक्षण
- गोशाळा
  - → गोबरगॅस शेणखत
  - → गोमूत्र विक्री
  - → गांडूळखतप्रकल्प
  - → दूध विक्री → गोमय गोमूत्र उत्पादने (प्रस्तावित)
- रोपवाटीका
- विक्रीकेन्द्र
- कै. माधवराव काणे स्मृतिस्तंभ
- कै. माधवराव काणे स्मृतिदालन
- श्री हनुमान मंदिर
- शेती
- त्रैमासिक वनसखा
- वाचनालाय
- माजी विद्यार्थी संघ
  - → क्रिडा महोत्सव
  - → पोलीसभरतीपूर्व प्रशिक्षण
- वनवासी वस्तू संग्रहालय (प्रस्तावित)
- संपर्क / संघटन
- दवाखाना

**पावसाच्या पाण्याचे थेंब खाली पडून क्रमाक्रमाने घडा भरुन येतो थेंबे थेंबे तळे साचे.**

## ❖ स्थानिक देणगीदार ❖

✦ रु. १८,०००.०० (प्रत्येकी)
→ सोहनी मेटल क्राफट प्रा.लि., उंबरगाव
✦ रु. ६,०००.००
→ सौ. इंदिरा हिराजी निकुंभ, तळासरी
✦ रु. ५,०००.०० (प्रत्येकी)
→ श्री. संदीप वैद्य, डहाणू
→ श्री. दिनेश आर. पिंपळे, डहाणू
→ माजी विद्यार्थी संघ, तळासरी
✦ रु. ३,५००.००
→ श्री. सुरज जे. धामणकर, डहाणू
✦ रु. ३,०००.००
→ श्री. गोरख डी. राऊत, डहाणू
✦ रु. २,६००.००
→ हरे कृष्णा मंदिर, तळासरी
✦ रु. २,५००.००
→ श्री. राजेश जे. सावंत, डहाणू
✦ रु. २,०००.०० (प्रत्येकी)
→ श्री. प्रमोद देसाई, डहाणू
→ श्री. दिपक नाटेकर, डहाणू
✦ रु. १,१००.०० (प्रत्येकी)
→ श्री. रमेश थोरात, कोदाड
→ श्री. परशुराम भुसारा, दाभाडी
✦ रु. १,०००.०० (प्रत्येकी)
→ श्री. रमेश लहू खरपडे, तिलोंडा
→ सौ. मिना दिलीप बुजड, डोंगारी
→ सौ. पार्वती कना गडग, शिसणे
→ श्री. शंकर मलावकर, आवढाणी
→ श्री. किशन देवजी वळवी, उपलाट
→ श्री. गोविंद रामजी काकड, गिरगाव
→ श्री. लक्ष्मण वरखंडे, वसा
✦ रु. ५११.००
→ श्री. दिपक पाटील, तळासरी
✦ रु. ५०१.०० (प्रत्येकी)
→ सुविधा जनरल स्टोअर्स, तळासरी
→ श्री. अजित मोहिते, तळासरी
→ श्री. जगदीश गणपत धुलसाडा, आंबेसरी
✦ रु. ५००.०० (प्रत्येकी)
→ श्री. ज्योतिंद्र पारेख, डहाणू
→ श्री. दिनेश आर. मंत्री, डहाणू
→ श्री. प्रमोद रमेश हाडळ, कोचाई
→ श्री. गणेश हाडळ, कोचाई
→ श्री. हरेश शंकर शिवदे, तळासरी
→ श्री. जगदीश चंदूभाई पटेल, तळासरी
→ श्री. जयकुमार प्रजापती, तळासरी
→ वंदना फूट वेअर, तळासरी
→ श्री. संजय देशमुख, रत्नागिरी
→ श्री. देसले, तळसरी
✦ रु. ३००.००
→ श्री. जयेश दिलीप ठक्कर, तळासरी
✦ रु. २२०.००
→ श्री. पुरुषोत्तम प्रजापती, धुंदलवाडी
✦ रु. २०१.००
→ श्री. सुनिल गांगोडे, धानिवरी
✦ रु. १००.०० (प्रत्येकी)
→ श्री. राजेश बेंडगा, कुर्झे
→ श्री. वसंत चुंभले, सुत्रकार
→ श्री. विष्णू रामजी दोडे, चळणी
→ श्री. विलास मेढा, करंजवीरा
→ सौ. निता डोंगरकर, तळासरी
→ सौ. तायडे, कासा
→ श्री. राजेंद्र नरेश कटीलकर, मोखाडा

**सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद!**

## ❖ धान्यरुपाने मदत करणारे देणगीदार ❖

→ **श्री. वाज्या देव्या डोंगरकर, आवढाणी-** तांदूळ ३० कि.
→ **श्री. सुनिल अग्रवाल, ठाणे, प. -** साखर ५० कि., गुळ, ३० कि., गोडेतेल, ९५ कि., बिस्किटे, २८० पाकीटे, मसाला ६ कि. लाडू १ पाकिट

## ❖ जाहिरातदाराना विनम्र आवाहन ❖

त्रैमासिक वनसखाचा पुढील अंक १ आक्टोबर २०१५ रोजी प्रसिद्ध होईल. हा अंक कै. माधवराव काणे स्मृति विशेषांक तसेच बाल विशेषांक म्हणून काढण्यात येईल. या अंकासाठी आपण स्वत:ची वैयक्तिक किंवा आपल्या उद्योग व्यवसायाची जाहिरात देऊन मदत करावी. ही नम्र विनंती!

## ❖ जाहिरात दर ❖

| | |
|---|---|
| रंगीत जाहिराती मलपृष्ठ रु. ५००० | कृष्णधवल जाहिराती |
| | संपूर्ण पान रु. ३००० |
| | अर्धपान रु. २००० |
| रंगीत जाहिराती मलपृष्ठ २ किंवा ३ - रु. ४०००/- | पाव पान रु. १००० |
| | शुभेच्छा रु. ५००/- |
| | दोन ओळी रु. ३०० |

**वनवासी विकास प्रकल्प या नावाने धनादेश (चेक) तसेच मजकूर पाठवा.**

**पत्ता : त्रैमासिक वनसखा, वनवासी विकास प्रकल्प तळासरी ४०१६०६ जि. पालघर.**

दुसऱ्यांना उपदेश करण्याचे पाण्डित्य पुष्कळ लोक दाखवतात. परन्तु हे शहाणपण स्वत:च्या कार्याच्या वेळी साधारणपडे विसरतात.

## ❖ देणगीदार यादी (जूलै २०१५) ❖

**✦ रु. १५,०००.०० (प्रत्येकी)**
→ श्री. नरेंद्र प्रभुदेसाई – बोरीवली(प)
→ श्री. अनिल शेवडे – विलेपार्ले(पूर्व)

**✦ रु. १०,०००.०० (प्रत्येकी)**
→ सौ.कल्पना अरविंद तवटे – विलेपार्ले(पूर्व)
→ श्री.कुंदन सखाराम खंडागळे – वसई(पूर्व)

**✦ रु. ६,०००.०० (प्रत्येकी)**
→ श्री. विश्वास गजानन बर्वे – पुणे
→ श्री. अरविंद रामचंद्र सरदेसाई – पुणे

**✦ रु. ५,००१.००**
→ ठाणे जिल्हा बॅंक कर्मचारी महासंघ – डोंबिवली(पूर्व)

**✦ रु. ५,०००.००**
→ कु. अर्पिता अविनाश बापट – पुणे

**✦ रु. ४,०००.०० (प्रत्येकी)**
→ श्री.डॉ. सुशांत सोपान तुसे/ डॉ. सुशांत सोनावणे – कांदीवली(प)
→ श्रीम. शर्मिला शेखर उपासणी – ठाणे(प)
→ श्रीम. सुचिता शैलेंद्र गोखले – रायगड

**✦ रु. ३,३००.००**
→ श्री. कमलाकर गोपाळ कुलकर्णी – वांद्रे(पूर्व)

**✦ रु. ३,०००.००**
→ श्री. सुरेश मंगसुळकर – कल्याण

**✦ रु. २,५००.०० (प्रत्येकी)**
→ श्री.समीर प्रतिनिधी – पुणे
→ श्री. पुष्कर ढवळे – पुणे
→ सौ. जया प्रतिनिधी – पुणे

**✦ रु. २,१००.००**
→ श्री.मनोहर रामचंद्र बोबडे – विलेपार्ले(पूर्व)

**✦ रु. २,०००.०० (प्रत्येकी)**
→ रजनी चाफेकर – नागपूर
→ श्री. पांडूरंग गणपत बोराडे – ठाणे(पूर्व)
→ श्री. श्रीनंद तुकाराम सागावकर – ठाणे
→ सौ. सुरेखा श्रीनंद सागावकर – ठाणे
→ निनाद पांडूरंग बोराडे – ठाणे

**✦ रु. १,००१.०० (प्रत्येकी)**
→ वेलेणकर सुवर्णतुला दाननिधी ट्रस्ट–सांगली
→ श्री. गुणेंद्र यशवंत भागवत – पुणे

**✦ रु. १,०००.००**
→ रोहित व प्रेमचंद्र – दहिसर(पूर्व)

**✦ रु. ५०१.००**
→ सौ.सुगंधा दिनकर नेरुळकर – सातारा

**✦ रु. ५००.०० (प्रत्येकी)**
→ श्रीम. दिपा प्रकाश केळकर – पुणे
→ श्री. दत्तात्रय खळदकर – पुणे

## ❖ वस्तुरुपाने मदत करणारे देणगीदार ❖

→ Jh- lt; n'ke[k & jRukfxjh
(भिंतीवरील घडयाळ – 1 नग)
→ Jh- ek/ko co & fxjxko
(सायन्स पुस्तके इ. 12 वी)
→ Jh- eg'k e=oknh & fxjxko
(शैक्षणिक साहित्यः पट्‌टया–100 नग, वहया–288 नग, पेन्सिल–100 नग, शार्पनर–100 नग, पेन–80 नग, खोडरबर–100 नग)
→ Jh- nokx HkVV@idk'k tu & ecb
(पंखे– 12 नग)
→ Jh-Mk- lfni lkuko.k & dkfnoyh
(हॉलीबॉल – 2 नग)
→ Mk- l'kkr lkiku rl & dkfnoyh
(फुटबॉल – 1 नग)
→ Jh- lrk"k flx & dkfnoyh
(बॅडमिंटन – 5 जोडी)
→ Jh-x.k'k jk;dj & dknhoyh
(शटल कॉक–12, स्कीपींग रोक– 10)
→ Jh-txUukFk o> & fxjxko
(पंखे – 2 नग)

## ❖ धान्यरुपाने मदत करणारे देणगीदार ❖

→ Jh-vxoky & Bk.k
(साखर–50कि, तांदूळ–75कि, तेल–12कि, हळद–1कि, तिखट–1कि, मसूरडाळ–10कि, मीठ–5कि, गुळ–10कि,)
→ Jh-Jhdkr dyd.kh& mcjxko
(तिखट– 15 किलो)
→ Jh-'kDykth (हळद– 09 किलो)
→ Jh-exuHkkbl iVy (मसाला– 06 किलो)
→ Jh-vfHk"kd vjfon Mchj & nfglj¼i½
(गूळ शेंगदाणा लाडू– 250 नग)
→ Jh- fodkl jkoth c/k& 'k.kljh
(तांदूळ– 23 किलो)
→ Jh- d".kk ckjD;k rkcMk& /kkfuojh
(तांदूळ– 25 किलो)
→ Jh-ifni frokjh&mcjxko (मसाला–15 किलो)
→ lk- oh.kk Jhdkr dyd.kh& mcjxko
(म्हैसूरपाक– 811 किलो)
→ Jh- lrk"k f'knk&m/kok (तिखट–15 किलो)
→ Jh- ekg;k uF;k cjQ& vkcljh
(भात– 50 किलो)

पावसाच्या पाण्याचे थेंब खाली पडून क्रमाक्रमाने घडा भरुन येतो थेंबे थेंबे तळे साचे.

# श्रमसेवेचा यज्ञ सेवायोगी गाडगेबाबा

सेवायोगी गाडगेबाबा म्हणतात, ‘बापहो, देव तीर्थात किंवा मूर्तीत नाही. तो तुमच्या समोर दरिद्रीनारायणाचे रूपाने प्रत्यक्ष उभा आहे. त्याचीच प्रेमाने सेवा करा.

| | | |
|---|---|---|
| भुकेल्यांना | - | अन्न |
| तहानलेल्यांना | - | पाणी |
| उघड्यानागड्यांना | - | वस्त्र |
| गरीब मुलामुलींना | - | शिक्षणासाठी मदत |
| बेघरांना | - | आसरा |
| अंध, पंगू रोग्यांना | - | औषधोपचार |
| पशुपक्षी मुक्या प्राण्यांना | - | अभय |
| बेकारांना | - | रोजगार |
| गरीब तरुणतरुणींचे | - | लग्न |
| दुःखी निराशांना | - | हिंमत |

हाच खरा रोकडा धर्म, हीच भक्ती आणि देवपूजा आहे.

सेवा योगी संत गाडगेबाबांनी साधारणपणे पन्नास वर्षे समाजजीवनाला वळण लावण्याचे काम केले. त्यांच्या कामाचे स्वरुप वरवर पाहता वेगवेगळे असले तरी त्यांना ‘माणसाला’ माणूस म्हणून प्रतिष्ठा प्राप्त करून द्यायची होती, हे आपल्या सहजपणे लक्षात आल्याशिवाय राहत नाही. समूहाचे सामाजिक दायित्वाचे भान जागवून, समाजाकडून समाजासाठी भव्य-दिव्य काम करवून घेता येते, याचा एक उत्तम प्रकारचा आदर्श गाडगेबाबांनी आपल्या कार्यातून घालून दिला आहे. त्यांनी महाराष्ट्रातील अनेक तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी, सार्वजनिक रुग्णालयांजवळ मोठमोठ्या धर्मशाळा बांधल्या, गोरक्षणे सुरू केली. सदावर्ते सुरु केली. हे करत असताना केवळ एका जातीला वा गटाला त्याचा उपयोग होणार नाही याची काळजी घेतली. सर्वांना समान वागणूक आणि सर्वांना समान संधी अशी बाबांची धारणा होती. आधुनिक संकल्पनेतील समता सेवायोगी गाडगेबाबांनी आपल्या कृतीतून साकार केली होती. अस्पृश्यतेवर आघात करताना बाबा म्हणत, “आपल्या हिंदुस्थानाला मोठा डाग आहे. तो धुवून काढण्याचा प्रयत्न करा. तो डाग कोणता?”

“शिवाशिव”

“बामण कोणी केले?”

“देवाने....”

“महार, मांग, मराठे, धोबी, चांभार हे कोणी केले?”

“सगळे देवानेच...”

“आईच्या पोटातून यायच्या वाटा वेगवेगळ्या आहेत का?”

“नाही, एकच आहे.”

“मग ही शिवाशिव आली कुठून? माणसाच्या दोनच जाती आहेत....किती?”

“दोन.”

“बाई आणि पुरुष या दोनच जाती. तिसरी जातच नाही.”

सेवायोगी गाडगेबाबा अशा संवादातून आपले विचार मांडत. त्यांचे कीर्तन म्हणजे वक्ता आणि श्रोता यांच्यातील संवाद असे. लोकांना लोकांचे व्यंग दाखवत त्याचे उत्तरही त्यांच्याकडून वदवून घेण्याचे काम बाबा करत. कोणत्याही प्रकारचे भेदभाव, जातिभेद समाजात नसावेत, माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळावी, माणूसपणाचा धर्म व्हावा यासाठी गाडगेबाबांनी आपल्या आयुष्यातील पन्नास वर्षे समाजसेवेसाठी वाहिली. जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत ते सेवारत राहिले.

## ❖ स्थानिक देणगीदार (जूलै २०१५) ❖

✦ **रु. १८००.००**
→ श्री. अर्जुन धर्मा बरफ –उधवा

✦ **रु. ११००.००**
→ श्री. राजेश बारक्या वेडगा – सावरोली

✦ **रु. १,०००.०० (प्रत्येकी)**
→ श्री. श्रीपत यादव – तळासरी
→ श्री. सुखदेव बेडसे – तळासरी
→ श्री. सदु बेंदर – हळदपाडा

✦ **रु. ५५२.००**
→ श्री. सुरेश वनश्या विल्हात – कवाडा

✦ **रु. ५०१.००**
→ श्री. रामजी जान्या खुताडे – कोचाई

✦ **रु. ५००.००**
→ सौ. कुसूम जयवंत थापड – तलासरी

✦ **रु. ३००.००**
→ श्री. राजेश बेंडगा – कुर्झे

✦ **रु. २०२.००**
→ सुमित्रा उमतोल – आंबेसरी

**सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद!**

**दुसऱ्यांना उपदेश करण्याचे पाण्डित्य पुष्कळ लोक दाखवतात. परन्तु हे शहाणपण स्वतःच्या कार्याच्या वेळी साधारणपडे विसरतात.**




विश्वहिन्दू परिषदेचा (क्षेत्रीय) शिक्षा वर्ग समारोप कार्यक्रम
मंचावर डावीकडून वर्गाधिकारी डॉ. हेमंत जांभेकर,
डॉ. प्रविणभाई तोगडीया, श्री. व्यंकटेश आबदेव,
श्री. देवकीनंदन जिंदल



मा. ना श्री. विष्णूजी सवरा (आदिवासी विकास मंत्री,
महाराष्ट्र शासन) यांचे स्वागत करताना
सर्वश्री लक्ष्मण खरपडे, रमेश मलावकर, सुधा मलावकर,
(डावीकडे) आम. पास्कल धनारे, विवेक वैद्य



पालघर लोकसभा मतदार संघाचे मा. खासदार
श्री. चिंतामणजी वनगा वनसखा अंक पाहाताना
दिसत आहेत. शेजारी मा.ना.श्री. विष्णूजी सवरा




स्व. अंधेर गुरुजींचा पूतळा अनावरण प्रसंगी बोलताना
मा. नामदार श्री. विष्णूजी सवरा



प्रकल्पाचे विश्वस्त श्री. सुरेशराव फाटक
गाईची पूजा करताना दिसत आहेत.




दि. २१ जून २०१५ : पहिला योगदिन
माध्यमिक विद्यालय तलासरी येथे पतंजली योगपीठाचे
कार्यकर्ते योग शिकवताना दिसत आहेत.

• सम्पर्क • सहयोग • संस्कार • सेवा • समर्पण •




# भारत विकास परिषद्

जे. बी. नगर शाखा

## गोशाला प्रकल्प सेवार्थ



### आवाहन

प्रिय बन्धुवर

भारत विकास परिषद् जे.बी.नगर शाखा संचलित तळासरी स्थित गौशाला निरन्तर प्रगति का ओर है। वर्तमान में वहाँ पर लगभग १५० गायों का भरण-पोषण, सुरक्षा और सेवा की जा रही है। गोमाता विश्व का ऐक मात्र एसा पशू धन है जिसका दूध, गोबर, गोमूत्र सभी अमृत के समान और औषधि के रुप में विश्व भर में प्रमाणित है।

आप जैसे महानुभावों के मार्गदर्शन, प्रेरणा, आशीर्वाद और सहयोग से हम गोसेवा के इस पुनित कार्य को और अधिक सुचारु रुप प्रदान कर सके इस हेतु हमें आपसे सहयोग की अत्यंत आशा है। कृपया किसी भी रुप में आप यथा शक्ति योगदान कर गोवंश की रक्षा में अपनी भागीदारी निभाए।

**संस्था द्वारा संचालित इस गोशाला में विभिन्न रुप से आप सहयोग कर सकते है -**

| | |
|---|---|
| गोदान पूजा विधी द्वारा (गाय के एक वर्ष चारे के साथ) | रु. ५१,०००/- |
| १ गाय का प्रति वर्ष चारा | रु. १५,०००/- |
| १ गाय को कटने से बचाने का खर्च | रु. ५,१००/- |
| १ गाय का चारा खिलाने का खर्च प्रति मास | रु. १,५००/- |
| सभी गायों को १ दिन दलिया खिलाने का खर्च | रु. २,१००/- |
| सभी गायों को आजीवन प्रतिवर्ष निश्चित १ दिन दलिया खिलाने का खर्च | रु. २१,०००/- |
| जन्मदिन, विवाह की वर्षगांठ, एकादशी, अमावस्या, पूर्णिमा, पूर्वजों के श्राद्ध, या किसी भी अवसर पर गुड़ एवं दलिया का सवामनी खर्च- | रु. २,१००/- |
| गाय की रोटी के निमित्त १ रुपया प्रतिदिन, प्रति रोटी के हिसाब से | रु. ३६५/- |

अन्य अनुदान अपनी श्रद्धानुसार-

चैक 'BVP J.B. Nagar Charitable Trust' के नाम से भी भेज सकते है । जिसे **आयकर में ८० जी का लाभ भी मिलेगा ।**

**दानदाता सीधे बैंक में भी अपना अनुदान जमा कर सकते है।**

**अनूप हिम्मतरामका**
अध्यक्ष

**रमेश वादपुरिया**
सचिव

**राजेश गाड़ोदिया**
कोषाध्यक्ष

**नथमल सिंघानिया, ९३२४५२००४०**
संयोजक-गोशाला प्रकल्प

**महावीरसाद गुप्ता, ९८९२१९०४०३**
सह-संयोजक-गोशाला प्रकल्प

**दिनांक : १ जुलै २०१५** पुस्त-प्रेष

प्रति,

सौ./श्री. ______________________________

______________________________

______________________________ पिन : 

प्रेषक : विश्व हिंदू परिषदेचा वनवासी विकास प्रकल्प, तळासरी, जि. पालघर, पिन ४०१६०६,
दूरभाष : ०२५२१-२२००१९ (कार्यालय) : ९२७२६०७८१८ (विवेक वैद्य)

वनवासी विकास प्रकल्पाचा सन २०१३-१४ चा वर्षिक अहवाल 'वनसखा' या नावाने दिनांक १ जुलै २०१५ रोजी मुंबई आणि तळासरी येथे प्रसिद्ध करण्यात आला. (केवळ खाजगी वितरणासारी)